पाक्षिक प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई • वर्षः 8 • अंकः 4 • 16 फेब्रुवारी 2026 • पृष्ठसंख्याः 36 • किंमतः 5 रू.



# भाजपा नंबर 1



अध्यक्षीय मनोगत

# भाजपा नंबर 1

नगरपालिका, नगर पंचायत, महापालिका निवडणुकांपाठोपाठ जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीतही भारतीय जनता पार्टी हा क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे. १२ जिल्हा परिषदांमधील ७३१ जागांपैकी भारतीय जनता पार्टीने २२५ तर महायुतीने ५५२ जागा जिंकत महाविकास आघाडीचा धुव्वा उडवला आहे. आजवर कोणत्याच पक्षाला अथवा आघाडीला असे दणदणीत यश मिळाले नव्हते. जिल्हा परिषदांमध्ये ५०२ जागा लढवून आपण २२५ जागा जिंकल्या आहेत. आपली यशाची टक्केवारी सुमारे ४५ टक्के एवढी आहे तर १२५ पंचायत समित्यांमध्ये १४६२ जागांपैकी आपण ४५९ जागा जिंकल्या आहेत. २०१७ च्या निवडणुकीच्या तुलनेत आपले ग्रामीण महाराष्ट्रातील म्हणजे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमधील स्थान आणखी बळकट झाले आहे. शहरी भागाबरोबरच ग्रामीण जनतेनेही भारतीय जनता पार्टी-महायुतीच्या विकासाच्या राजकारणाला कौल दिला आहे. नगरपालिका, नगर पंचायत, महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्या निवडणुका या पक्षाच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या असतात. लोकसभा, विधानसभा, विधान परिषदेच्या पदवीधर, शिक्षक या निवडणुकांमध्ये पक्षाचे सर्वसामान्य कार्यकर्ते मैदानावर लढत असतात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांमधून नेतृत्व घडवणाऱ्या असतात. अशा निवडणुकांमध्ये नेत्यांनी कार्यकर्त्यांना बळ देणे अपेक्षित असते. म्हणूनच महायुतीने या निवडणुकांमध्ये अनेक ठिकाणी आपापल्या कार्यकर्त्यांना लढण्याचे स्वातंत्र्य दिले. जेथे शक्य होते तेथे महायुतीतील घटक पक्षांनी समन्वयाने निवडणुका लढवल्या. या निवडणुकांमध्ये उद्धव ठाकरे आणि काँग्रेसची दयनीय अवस्था झाली. उद्धव ठाकरे यांना मुंबई महापालिकेच्या पलीकडे कोणत्याही निवडणुकीत रस नव्हता. महापालिका निवडणुकांमध्ये उद्धव ठाकरे मुंबईबाहेर पडलेच नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांसाठी ते उबाठा कार्यकर्त्यांसाठी प्रचार करतील, अशी अपेक्षा उबाठाच्या कार्यकर्त्यांनीही ठेवली नव्हती. एकेकाळी भारतीय जनता पार्टीला शहरी आणि शेटजी-भटजीचा पक्ष म्हणून हिणवले जात असे. गेल्या १० वर्षात भारतीय जनता पार्टी खेडोपाडी नव्हे वाडीवस्तीवर पोहचला आहे. ग्रामीण भागातील मतदारांनाही मोदी सरकारच्या आणि राज्य सरकारच्या विकास योजनांचा भरभरून लाभ होत आहे. यामुळेच ग्रामीण मतदारांचा भाजपा नेतृत्वावर विश्वास बसला आहे. ग्रामीण भागातील रस्ते, पूल, सिंचन योजना यासारख्या पायाभूत सुविधांची कामे भाजपा सरकारमुळे वेगाने मार्गी लागली आहेत. ग्रामीण भागात वाडीवस्ती, दुर्गम भागात पक्के रस्ते तयार झाले आहेत. पाटबंधारे प्रकल्पामुळे शेतीला मुबलक पाणी मिळू लागले आहे. अनेक वर्षे देशात काँग्रेसची सत्ता होती. राज्यातही काँग्रेसने अनेक वर्षे राज्य केले. त्या काळातील आणि आजच्या काळातील फरक सामान्य माणसाला लक्षात येत आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर उर्वरीत जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका होतील. या निवडणुकांमध्येही आपण क्रमांक एकचा पक्ष ठरणार आहोत. सर्व कार्यकर्त्यांचे या विजयाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,

bjpmaha.manogat@gmail.com

editor.bjpmanogat@gmail.com

येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

मुंबईत हिंदू-मराठी महापौर भाजपाने शब्द पाळला ........ ०४



अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मोठा लाभ ........ ०८



महाराष्ट्रासाठी भरघोस तरतूद असलेला अर्थसंकल्प ........ ११



रेल्वे विकासकामांसाठी तब्बल २३ हजार ९२६ कोटींची... ........ १३



ब्रॅण्ड देवाभाऊ ........ १८



पंगा भारताशी, ट्रम्प तोंडघशी! ........ २०



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# मुंबईत हिंदू-मराठी महापौर
# भाजपाने शब्द पाळला





मुंबईच्या महापौरपदी भारतीय जनता पार्टी- महायुतीच्या ऋतु तावडे आणि उपमहापौरपदी शिवसेनेचे संजय घाडी यांनी अलिकडेच आपल्या पदांचा कार्यभार स्वीकारला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जातीने उपस्थित होते. ४४ वर्षांनी मुंबईचे महापौर पद भारतीय जनता पार्टीला मिळाले आहे. १९८२ मध्ये डॉ. प्रभाकर पै हे भाजपातर्फे महापौरपदी निवडून आले होते. ऋतु तावडे यांच्या निवडीने भारतीय जनता पार्टीची, 'मुंबईचा महापौर हिंदूच होईल आणि मराठी व्यक्तीच होईल,' ही घोषणा प्रत्यक्षात आली आहे.

**मुंबईच्या** महापौर–उपमहापौर निवडीनंतर दुसऱ्याच दिवशी परभणीच्या महापौरपदाची निवडणूक झाली. या निवडणुकीत उबाठाचे सय्यद इक्बाल हे काँग्रेसच्या पाठिंब्यावर महापौरपदी विराजमान झाले. १९९० च्या दशकात वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी परभणीत सभेतच बोलताना लोकसभा–विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात, 'खान हवा की बाण हवा', असे वक्तव्य केले होते. वंदनीय बाळासाहेबांचे हे उद्गार संपूर्ण मराठवाड्यात परिणामकारक ठरले. संभाजीनगर, परभणी, हिंगोली अशा लोकसभेच्या जागांवर शिवसेनेला सातत्याने विजय मिळाला. त्याच परभणीत उबाठांनी खान महापौर करावा, याला काय म्हणावे?

मुंबई महापालिका निवडणुकीत उद्धव ठाकरेंनी आपली होती नव्हती तेवढी पुण्याई पणाला लावली होती. विधानसभा निवडणुकीत दणकून पराभूत झालेल्या उबाठांना मुंबई महापालिकेचाच आधार उरला होता. भारतीय जनता पार्टीच्या विरोधात असलेल्या प्रसारमाध्यमातील, समाजकारणातील प्रभावशाली मंडळींनी उबाठांनी ही निवडणूक जिंकावी, यासाठी देव पाण्यात घातले होते. वेगवेगळ्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीच्या विरोधात अत्यंत विखारी प्रचार केला गेला. तरीही भाजपा–महायुतीने मुंबई महापालिका

निवडणूक जिंकलीच. अनेक महापालिकांमध्ये उबाठांना आपले खातेही उघडता आलेले नाही. जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये उबाठांना ५० जागाही जिंकता आलेल्या नाहीत. २०२२ मध्ये मुख्यमंत्रीपद गेल्यानंतर व २०२४ मध्ये विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही मुंबई महापालिका आपलीच आहे, या भरवशावर उद्धव ठाकरे आणि त्यांचे शिलेदार होते. कोणत्याही परिस्थितीत मुंबई जिंकायचीच या ईर्षेने उबाठांनी राज ठाकरेंशीही हातमिळवणी केली. त्याही पुढे जाऊन कट्टर मुस्लिम संघटनांना मुस्लिम महापौर करण्याचे आश्वासनही देऊन टाकले. न्यूयॉर्कच्या महापौरपदी मुस्लिम व्यक्तीची निवड झाल्यानंतर भारतविरोधी शक्तींना प्रचंड आनंद झाला होता. भारतातील हिंदू-मुस्लिम धर्मियांमध्ये आणखी फूट पाडून धार्मिक अशांतता निर्माण करण्याच्या देशविरोधी शक्तींच्या हालचालींना मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गती आली होती. मुंबई भाजपा अध्यक्ष आ. अमित साटम यांनी भाजपा-महायुतीला बहुमत मिळाल्यास हिंदू-मराठी व्यक्तीच महापौर होईल, असे जाहीर केले होते. उद्धव ठाकरेंनीही असे आश्वासन द्यावे, असे आव्हानही आ. अमित साटम यांनी दिले होते. मात्र उबाठांनी व संजय राऊतांनी हे आव्हान स्वीकारले नाही. उबाठाला बहुमत मिळाल्यास हिंदू व्यक्ती महापौर होईल, मुस्लिम होणार नाही, असे जाहीरपणे सांगण्याचे धाडस उद्धव ठाकरेंनी दाखवले नाही. मुंबई महापालिकेच्या सत्तेसाठी कोणत्या थराला जाण्याची तयारी उबाठांनी ठेवली होती, हे यातून दिसले.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत उबाठा आणि काँग्रेसला व्होट जिहादमुळेच भाजपा-महायुतीपेक्षा अधिक जागा मिळाल्या. उबाठांना व्होट जिहादच्या प्रयोगामुळेच महापालिका निवडणुकीतही मुंबईत यश मिळवण्याची स्वप्ने पडत होती. आपल्या वडिलांनी म्हणजे वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी काँग्रेसच्या मुस्लिम लांगूलचालनाच्या राजकारणाविरोधात सातत्याने प्रहार केले, याचा विसर उद्धव ठाकरेंना पडला होता. काँग्रेस आणि शरद पवारांच्या मदतीने उद्धव ठाकरेंनी अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद मिळाले, पण त्या बदल्यात उद्धव ठाकरेंनी आपले प्रचंड नुकसान करून घेतले. अर्थात उद्धव ठाकरे आणि त्यांचे पुत्र आदित्य व महाविद्वान सल्लागार संजय राऊत यांना आपण काय चूक केली हे कळणार नाही.

२०१९ मध्ये भाजपाच्या साथीत निवडणूक लढवून, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर मतांचा जोगवा मागून उबाठा आणि संजय राऊतांनी भाजपाचा नव्हे तर मतदारांचाही विश्वासघात केला. निकाल लागल्यानंतर भाजपा नेतृत्वाशी संपर्क तोडून टाकला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आम्हाला अडीच वर्षे मुख्यमंत्रीपद देण्याचे आश्वासन दिले होते, असे धादांत खोटे सांगत उद्धव ठाकरेंनी आपल्या विश्वासघाताचे समर्थन करण्याचा लंगडा प्रयत्न केला. या विश्वासघाताची मोठी किंमत उद्धव ठाकरेंना मोजावी लागत आहे. मुंबईतला मराठी मतदार आपल्याशिवाय कोठे जात नाही या भ्रमात वावरणाऱ्या उद्धव ठाकरेंना मतदारांनी जागेवर आणले. मराठी मतदारांना भावनिक आवाहन केले गेले, भाजपाचा महापौर झाल्यास तुम्हाला मुंबईबाहेर काढले जाईल, अशी भीती दाखवली गेली. तरीही मुंबईच्या मतदारांनी उद्धव ठाकरेंना सत्ता दिली नाही. मुंबईचा मतदार महायुती सरकारने मुंबईत केलेल्या रस्ते, उड्डाणपूल, मेट्रो यासारख्या सुविधांमुळे होणाऱ्या फायद्यांचा अनुभव घेत आहे. यामुळेच मुंबईकरांनी भाजपा-महायुतीला आपला कौल दिला. परभणी व्यतिरिक्त एकही महापौरपद उबाठांच्या वाटणीला आले नाही. भारतीय जनता पार्टीच्या विरोधात गेल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या मागे काँग्रेस तसेच देशातील सर्व शहरी नक्षलवादी गटांनी आपली ताकद उभी केली. मात्र त्याचा उबाठांना उपयोग झाला नाही. कारण बहुसंख्य मतदार उबाठांपासून दूर गेले. आणखी काही महिन्यांनी विधान परिषद निवडणूक होणार आहे. २०२० मध्ये उद्धव ठाकरे विधान परिषदेवर बिनविरोध निवडून गेले होते. आता उबाठांकडे फक्त २० आमदार शिल्लक आहेत. एवढ्या आमदारांच्या बळांवर त्यांना पुन्हा विधान परिषदेत जाता येणार नाही. अर्थात तेथे जाऊन उबाठा फार मोठे दिवे लावणार आहेत, असेही नाही. मुख्यमंत्री गेल्यानंतर उद्धव ठाकरे विधान परिषदेच्या कामकाजात अपवादानेच सहभागी झाले. मुंबईचे महापौरपद ही आपली मक्तेदारीच आहे अशा गुर्मीत वावरणाऱ्या उबाठांना मतदारांनी सणसणीत चपराक दिली. विश्वासघाताचे राजकारण फार काळ चालत नाही आणि त्याचे फायदे काही काळ टिकतात. याचा अनुभव उद्धव ठाकरे सध्या घेत आहेत. यातून ते काही शिकतील, अशी अपेक्षा ठेवणे व्यर्थ आहे. ■




कोल्हापूर– रुपाराणी निकम यांची महापौरपदी निवड– उपस्थिती– उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खा. धनंजय महाडिक आदी.



नाशिक– महापौरपदी हिमगौरी आहेर–आडके, उपमहापौरपदी विलास शिंदे यांची निवड– उपस्थिती– जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आदी.



छत्रपती संभाजीनगर– महापौरपदी समीर राजूरकर यांची निवड– उपस्थिती– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, बहुजन विकास मंत्री अतुल सावे, खा. डॉ. भागवत कराड, प्रदेश सरचिटणीस आ. संजय केनेकर, आ. नारायण कुचे आदी.



पुणे– महापौरपदी मंजुषा नागपुरे यांची निवड– उपस्थिती– केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आदी.



चंद्रपूर– महापौरपदी संगीता खांडेकर, उपमहापौरपदी प्रशांत दानव यांची निवड– उपस्थिती– आ.सुधीर मुनगंटीवार आदी.



सोलापूर– महापौरपदी विनायक कोंड्याल, उपमहापौरपदी ज्ञानेश्वरी देवकर यांची निवड– उपस्थिती– आ. देवेंद्र कोठे आदी.



सांगली– महापौरपदी धीरज सूर्यवंशी, उपमहापौरपदी गजानन रामू मगदूम यांची निवड.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीतही भाजप नंबर 1

**एकूण १२ जिल्हा परिषदांच्या ७३१ जागांवर निवडणूक झाली**

**महायुति : एकूण ५५२ जागा जिंकल्या.**
**भारतीय जनता पार्टी २२५ जागा (सर्वात मोठी पार्टी)**
**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – (अजित पवार) १६५ जागा**
**शिवसेना (एकनाथ शिंदे): १६२ जागा**
**महाविकास आघाडी: एकूण १२४ जागा**
**काँग्रेस : ५५ जागा**
**शिवसेना (उद्धव ठाकरे): ४३ जागा**
**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी –(शरद पवार): २६ जागा**

**अन्य:**
**मनसे :** २ जागा, **अपक्ष :** ३१
**अन्य पक्ष:** ३६ जागा.
या निवडणुकीत एकूण ६८.२८% मतदान झाले.
**स्ट्राइक रेट:** भाजपाने ५०२ जागांवर निवडणूक लढवली, त्यात २२५ जागांवर विजय मिळवला. त्या आधारावर जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपाचा स्ट्राइक रेट ४४.८२% आहे.
भारतीय जनता पार्टी ७ जिल्ह्यांत म्हणजे (सिंधुदुर्ग, सातारा, सोलापुर, छत्रपति संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर) सर्वात मोठा पक्ष ठरला आहे.
**सिंधुदुर्ग** – ५० पैकी २७ जागा जिंकल्या.
**सोलापुर** – ३८ (भारतीय जनता पार्टीने बहुमत मिळवले.)
**पुणे** – १० जागा
**छत्रपति संभाजीनगर** – २३ जागा
**परभणी**– २४ जागा
**धाराशिव**– १९ जागा
**सातारा**– २७ जागा
**लातूर** – भाजपाने १८ जागा जिंकल्या.
(काँग्रेस २३ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला.)
जिल्हा परिषदांमध्ये ७३१ जागा होत्या. त्यात एकूण २,६२४ उमेदवार होते.

**पंचायत समिती निकाल:** १२५ पंचायत समित्यांमधील १,४६२ जागांपैकी भाजपाने ४५९ जागा जिंकल्या. महायुतीचा जिल्हा परिषदमध्ये ८० टक्के स्ट्राइक होता तर महाविकास आघाडीचा १८ टक्के. पंचायत समिती निवडणुकांमध्येही महायुतीचा स्ट्राइक रेट ७० टक्के तर महाविकास आघाडीचा २० टक्के होता.

**परभणी जिल्ह्यात सर्वात अधिक ७४.८९% टक्के मतदान झाले.**
रत्नागिरीत सर्वात कमी म्हणजे ५५.७९% मतदान झाले. जिल्ह्यांची नावे: रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापुर, कोल्हापुर, छत्रपति संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर.

**२०१७ मधील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती परिस्थिती**

**एकूण जागा–**
**जिल्हा परिषद** – ७२७
**भारतीय जनता पार्टी** – १४१
**सेना** – १४८
**काँग्रेस** – १२६
**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी** – २१७
**अन्य** – ७२
**अपक्ष** – २३
**१२५ पंचायत समिती – २०१७**
**एकूण जागा** – १४५४
**भारतीय जनता पार्टी** – २८४
**सेना** – ३००
**काँग्रेस** – २७७
**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी** – ४१९
**अन्य** – १४०, **अपक्ष** – ३४

# अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मोठा लाभ



● मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

> केंद्रीय अर्थसंकल्प वास्तववादी, विकासाभिमुख आणि आर्थिकदृष्ट्या शिस्तबद्ध असा असून महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी तो अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

**यंदाचा** केंद्रीय अर्थसंकल्प हा वास्तववादी, विकासाभिमुख आणि आर्थिक शिस्तीचा असून महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी तो अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. कर हस्तांतरणाच्या नव्या सूत्रामुळे केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मिळणाऱ्या निधीत यंदा जवळपास १५ ते २० हजार कोटींची वाढ होणार असून एकूण ९८ हजार ३०६ कोटींचा निधी राज्याला मिळणार आहे. तर पायाभूत प्रकल्पांसाठी एकट्या मुंबई महानगर क्षेत्रातच साडेबारा हजार कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्याशिवाय विविध योजनांमधून महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त निधी मिळणार आहे.


महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला आहे. विरोधक मात्र नेहमीप्रमाणे 'महाराष्ट्राला काहीच मिळालं नाही', अशी टीका सुरू करतात. अर्थसंकल्पाचा सविस्तर तपशील आल्यावर महाराष्ट्राला काय काय मिळाले ते सविस्तर मांडूच. मात्र, प्रथमदर्शनी असे दिसते की, निव्वळ कर उत्पन्नाचा वाटा म्हणून महाराष्ट्राला ९८ हजार ३०६ कोटी मिळणार आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे २० हजार कोटींची वाढ असून दरवर्षी हा निधी वाढतच जाणार आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील प्रकल्पांचा विचार केला तरी आतापर्यंत साडेबारा हजार कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर झालेला आहे. याशिवाय राज्यभरातील इतर प्रकल्पांसाठीही मोठ्या प्रमाणावर तरतुदी करण्यात आल्या आहेत. संपूर्ण अर्थसंकल्प पुढे येईल तेव्हा ही रक्कम आणखी वाढलेली दिसेल. एकूणच हा अर्थसंकल्प वास्तववादी, विकासाभिमुख आणि आर्थिकदृष्ट्या शिस्तबद्ध असा असून महाराष्ट्रासह संपूर्ण




देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी तो अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पातून विविध क्षेत्रांना पुढील काही वर्षांसाठी दिशा, गती आणि आवश्यक निधी देण्याचा प्रयत्न स्पष्टपणे दिसून येतो. विशेषतः वाढत्या शहरीकरणाला नियोजनबद्ध केले जाणार आहे. पाच लाखांपेक्षा अधिक लोकसंख्येच्या सर्व शहरांचा एकात्मिक विचार या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. याचा मोठा फायदा महाराष्ट्राला होईल. उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती हे या अर्थसंकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सात वेगवेगळ्या प्राधान्य क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक सवलती देऊन गुंतवणुकीला चालना दिली जाणार आहे. महाराष्ट्राला याचा मोठा लाभमिळेल. पायाभूत सुविधा क्षेत्रात केंद्र सरकार यावर्षी तब्बल १२ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. दहा वर्षांपूर्वी दरवर्षी केवळ एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होत असताना, आज एका वर्षात १२ लाख कोटींची गुंतवणूक होणे हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. शेती, पशुपालन, मत्स्य व्यवसाय आणि सिंचन या चार क्षेत्रांसाठी भरघोस तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच प्रत्येक ग्रोथ हबला पाच हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत.

महाराष्ट्रात आधीच एमएमआर, पुणे आणि नागपूर असे तीन ग्रोथ हब्स तयार असल्याने राज्याला याचा मोठा लाभहोईल. उद्योगांसाठीच्या विविध कॉरिडॉर्समुळे महाराष्ट्राला विशेष फायदा होणार आहे. मुंबई–पुणे







हायस्पीड कॉरिडॉरची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असून, पुणे–हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्याच्या विकासाला मोठी चालना मिळेल. एकूणच या अर्थसंकल्पातील तरतुदी महाराष्ट्राच्या औद्योगिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी अत्यंत पूरक असून राज्याला भविष्यातील विकासाच्या आघाडीवर नेणाऱ्या ठरणार आहे.

जर आपण संपूर्ण अर्थसंकल्पाकडे पाहिले, तर भारत तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असल्याचे प्रतिबिंब यात स्पष्टपणे दिसून










येते. ७ टक्क्यांचा विकास दर राखत भारत पुन्हा एकदा जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरलेला आहे. हे सर्व साध्य करत असतानाच वित्तीय तूट साडेचार टक्क्यांच्या आत आणण्यात अर्थमंत्र्यांना यश मिळाले आहे. कोव्हिड काळात वाढलेली तूट टप्प्याटप्प्याने कमी करण्याचे आश्वासन अर्थमंत्र्यांनी दिले होते. ते आश्वासन प्रत्यक्षात आणत पूर्ण केलेले आहे. 'डेट-टू-जीडीपी'च्या प्रमाणातही लक्षणीय सुधारणा झाली असून तो हळूहळू ५० टक्क्यांच्या दिशेने वाटचाल करत आहे. हे एका सुदृढ अर्थव्यवस्थेचे लक्षण मानले जाते. एकूणच आर्थिक शिस्त, विकासाचा वेग आणि दीर्घकालीन स्थैर्य या तिन्ही बाबींचा समतोल साधणारा हा अर्थसंकल्प आहे. पुढील काळात सर्व राज्यांना विकासाची संधी मिळेल, अशा प्रकारच्या तरतुदी यात करण्यात आल्या आहेत.

कर प्रणालीकडे पाहिल्यास सामान्य नागरिकांसाठीचे अनावश्यक 'कंप्लायन्स' मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात आले आहेत. व्यावसायांवरील 'कंप्लायन्स' ही सुलभ करण्यात आले असून छोट्या चुकांवर थेट शिक्षा अथवा दंड लावण्याऐवजी त्या दुरुस्त करण्याची संधी देण्याचा दृष्टिकोन स्वीकारण्यात आली आहे. कर्करोगासह काही गंभीर आणि अत्यावश्यक आजारांवरील औषधांवरील आयात शुल्क रद्द केल्यामुळे रुग्णांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. कर सुधारणांची प्रक्रिया अधिक व्यवस्थित आणि वास्तववादी पद्धतीने या अर्थसंकल्पात मांडण्यात आली आहे. दरवर्षी कर रचनेत बदल होणे अपेक्षित नसते. मागील काही वर्षांत कर रचनेत मोठे बदल झाले, करदात्यांना दिलासा देण्यात आला. यावर्षी भर हा मुख्यतः 'रॅशनलायझेशन'वर देण्यात आला आहे. लोकांना अधिक सवलती अपेक्षित असणे साहजिक आहे. मात्र, मागील बजेटमध्ये दिलेल्या मोठ्या सवलतीनंतर यंदा व्यवस्था अधिक स्थिर आणि व्यवहार्य करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एकूणच, हा अर्थसंकल्प वास्तववादी, विकासाभिमुख आणि आर्थिकदृष्ट्या शिस्तबद्ध असा असून, महाराष्ट्रासह संपूर्ण देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी तो अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. ■

# महाराष्ट्रासाठी भरघोस तरतूद असलेला अर्थसंकल्प

● प्रकाश गाडे

महाराष्ट्राच्या प्रत्येक भौगोलिक विभागाचे वैशिष्ट्य ओळखून अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या अर्थसंकल्पात जो 'निधीचा पाऊस' पाडला आहे, त्याची विभागवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

## कोकण विभाग (मुंबईसह)



● जागतिक व्यापाराचे प्रवेशद्वार कोकणच्या समुद्रकिनारपट्टीचा विकास हा राज्याच्या तिजोरीसाठी महत्त्वाचा आहे. वाढवण बंदर (पालघर) यासाठी २,५०० कोटींची तरतूद ही केवळ सुरुवात आहे. हे बंदर जगातील पहिल्या १० बंदरांमध्ये स्थान मिळवेल, ज्यामुळे कोकणात ५ लाख प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील.

● कोकणातील नगदी पिके म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काजू, नारळ, सुपारी आणि कोको या पिकांसाठी विशेष बोर्ड स्थापन करून प्रक्रिया उद्योगांना ५०० कोटींचे अनुदान दिले आहे. आता कोकणचा काजू थेट लंडन न्यूयॉर्कच्या बाजारपेठेत जाईल.

● मुंबई लोकल : मुंबईकरांच्या प्रवासासाठी १,२०० कोटी दिले आहेत, ज्यामुळे नवीन ५ व्या आणि ६ व्या मार्गिकेचे काम वेगाने पूर्ण होईल.

## विदर्भ




● विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष भरून काढण्याला मोदी सरकारने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. सिंचनासाठी ३,५०० कोटी रूपयांची तरतूद केली आहे. त्यातून गोसीखुर्द, जिगाव आणि निम्न पांढरा यांसारख्या प्रकल्पांसाठी हा निधी संजीवनी ठरेल. यामुळे लाखो हेक्टर जमीन ओलिताखाली येईल.

● मिहानमध्ये नागपूरच्या मिहान प्रकल्पात नवीन आयटी आणि लॉजिस्टिक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी कर सवलती जाहीर केल्या आहेत.

● वर्धा-नांदेड रेल्वेसाठी ३,४४५ कोटी दिल्याने कापूस उत्पादक पट्ट्यातील वाहतूक स्वस्त आणि जलद होईल.

## मराठवाडा




● या बजेटमध्ये मराठवाड्याला रेल्वे आणि पाण्यासाठी ऐतिहासिक वाटा मिळाला आहे. मराठवाडा वॉटर ग्रीडसाठी केंद्र सरकारकडून तांत्रिक आणि आर्थिक मदतीची तरतूद या बजेटमध्ये केले आहे.

● अहमदनगर-बीड-परळी या मार्गासाठी ४,९५७ कोटी यामुळे ५० वर्षांची प्रतीक्षा पूर्णत्वास येईल.

● जालना-जळगाव ५,८०४ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. यामुळे मार्गाने मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र जोडले जाणार.

● ऑरिक सिटी (छत्रपती संभाजीनगर) : नवीन इंडस्ट्रियल टाऊनशिपसाठी विशेष निधी, ज्यामुळे मराठवाडा हे राज्याचे नवीन 'मॅन्युफॅक्चरिंग हब' बनेल.

## उत्तर महाराष्ट्र



● मनमाड-इंदोर रेल्वेसाठी १६,३२१ कोटींची विक्रमी तरतूद ही या भागासाठी 'गेम चेंजर' ठरेल. यामुळे उत्तर महाराष्ट्रातील शेतीमालाला थेट दिल्ली – उत्तर भारताची बाजारपेठ मिळेल.

● कांदा आणि द्राक्ष प्रक्रिया यासाठी नाशिक आणि लासगाव भागातील कांदा उत्पादकांसाठी साठवणूक आणि निर्यातीसाठी 'कोल्ड चेन' उभारण्यासाठी विशेष निधी.

● नर्मदा-तापी नदीजोड प्रकल्प खान्देशातील सिंचनासाठी या प्रकल्पाच्या सर्वेक्षण आणि नियोजनाला गती देण्यात आली आहे.

## पश्चिम महाराष्ट्र

● मुंबई-पुणे हायस्पीड रेल्वे तासाभरात पुणे-मुंबई प्रवास शक्य करण्यासाठी ५,००० कोटींचे नियोजन.

● इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट २०% वरून वाढवल्याने कोल्हापूर, सांगली आणि सोलापूरच्या साखर कारखान्यांना वर्षाला २०,००० कोटींचा अतिरिक्त फायदा होईल.



● पुण्याच्या वाहतूक कोंडीसाठी केंद्राकडून मेट्रो विस्ताराला भरघोस निधी मिळाला आहे.

● पुणे-मिरज-लोंढा रेल्वे प्रकल्पासाठी ६,४६३ कोटी रुपयांच्या निधीमुळे दक्षिण भारताशी होणारा व्यापार अधिक सोपा होणार आहे.

● एकूण रेल्वे कामांच्या विस्तरासाठी २३,७७८ कोटी रूपयांच्या निधीची तरतूद केली आहे. हा निधी काँग्रेस काळापेक्षा २० पट जास्त आहे.



● १५,००० कोटी रुपये महाराष्ट्रातील महामार्गासाठी देण्यात आले आहेत. प्रत्येक विभाग राष्ट्रीय महामार्गाने जोडला जाणार.



● प्रत्येक जिल्ह्यातील मुलींच्या वसतिगृहासाठी १००० कोटींचा सामायिक निधीची तरतूद करण्यात आली आहे.

काँग्रेसच्या काळात विभागवार केवळ 'आश्वासने' दिली जात होती, मात्र मोदीजींच्या काळात प्रत्यक्ष 'आकडेवारी' आणि 'निधी' जमिनीवर दिसत आहे. ■

# रेल्वे विकासकामांसाठी तब्बल २३ हजार ९२६ कोटींची तरतूद



● डॉ. स्वप्नील बी. मंत्री

> अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी भरीव तरतूद करण्यात आली असून, भारतीय रेल्वेसाठी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात एकूण २ लाख ७८ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी महाराष्ट्रासाठीच २३ हजार ९२६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

**काँग्रेस** सरकारच्या काळातील निधीच्या तुलनेत ही तरतूद सुमारे २० पट अधिक असून, यामुळे राज्यातील रेल्वे पायाभूत सुविधांना मोठी चालना मिळणार आहे. सध्या महाराष्ट्रात बुलेट ट्रेन, हायस्पीड रेल्वे आणि डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉरसह सुमारे १ लाख ७० हजार कोटी रुपयांचे विविध रेल्वे प्रकल्प प्रगतीपथावर असून, या प्रकल्पांमुळे प्रवासी तसेच मालवाहतुकीस गती मिळून राज्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे.

### राज्यात दोन हायस्पीड कॉरिडॉर

या अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी दोन महत्त्वाच्या हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई-पुणे हायस्पीड कॉरिडॉरमुळे सध्या तीन ते चार तास लागणारा प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत पूर्ण करता येणार आहे. तसेच पुणे-हैदराबाद प्रवासाचा कालावधी १ तास ५५ मिनिटांवर येणार असून, मुंबई ते हैदराबाद हे अंतर तीन तासांच्या आत पार करता येणार आहे. हे सर्व कॉरिडॉर ताशी ३५० किलोमीटर वेगासाठी डिझाइन करण्यात आले आहेत.

### वाढवण बंदराला थेट रेल्वे जोड:

पूर्व-पश्चिम डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर प्रकल्पाचीही घोषणा करण्यात आली आहे. या मार्गामुळे महाराष्ट्रातील वाढवण बंदराला थेट रेल्वे जोड मिळणार असून, हे बंदर जागतिक पातळीवरील सर्वाधिक मोठ्या बंदरांपैकी एक ठरण्याची अपेक्षा आहे. या कनेक्टिव्हिटीमुळे महाराष्ट्रासह गुजरात, छत्तीसगड, मध्य प्रदेश, ओडिशा आणि पश्चिम बंगाल या राज्यांशी दळणवळण अधिक सुलभ होणार आहे.

### १०० टक्के विद्युतीकरण पूर्ण:

महाराष्ट्रात १०० टक्के रेल्वे विद्युतीकरण पूर्ण झाले असून, २०१४ नंतर ३,७४४ कोटी रुपयांचे विद्युतीकरणाचे काम करण्यात आले आहे. तसेच राज्यात आतापर्यंत १,२२८ उड्डाणपूल आणि अंडरपास बांधण्यात आले

असून, त्यामुळे रस्ते वाहतुकीच्या सुरक्षिततेत लक्षणीय वाढ झाली आहे.

**वंदे भारत, कवच:**


राज्यात सध्या १२ जोड्या वंदे भारत आणि पाच जोड्या अमृत भारत गाड्या धावत असून, प्रवाशांना आधुनिक, वेगवान आणि सुरक्षित रेल्वे सेवा उपलब्ध होत आहे. रेल्वे सुरक्षेसाठी 'कवच' प्रणालीअंतर्गत महाराष्ट्रात आतापर्यंत ५७६ किलोमीटर मार्गावर कवच कार्यान्वित करण्यात आले आहे. ३,६१७ किलोमीटरवर काम सुरू असून, एकूण ४,९८१ किलोमीटरचे कवच प्रकल्प मंजूर झाले आहेत. या सर्व तरतुदींमुळे महाराष्ट्रातील रेल्वे पायाभूत सुविधा अधिक सक्षम होऊन, राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळेल.

**अमृत भारत स्थानके:**

राज्यात अमृत भारत योजनेअंतर्गत १३२ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम सुरू असून, त्यासाठी ५,६७५ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येत आहे. यापैकी १७ स्थानकांची कामे पूर्ण झाली आहेत.

**महाराष्ट्रात रेल्वे पायाभूत सुविधा अधिक बळकट करण्यासाठी खालीलप्रमाणे काम सुरु करण्यात आली आहेत.**

- अहिल्यानगर–बीड–परळी नवीन रेल्वे लाईन (२६१ किमी).
- बारामती–लोणंद (६४ किमी),
- इंदौर–मनमाड (३६० किमी),
- जालना–जळगांव (१७४ किमी),
- कल्याण–कसारा तिसरी लाईन (६८ किमी),
- वर्धा–बल्लारशहा तिसरी लाईन (१३२ किमी)
- राजनांदगांव–नागपूर तिसरी लाईन (२२८ किमी),
- जळगांव–मनमाड चौथी लाईन (१६० किमी),
- सोलापूर–तुळजापूर–उस्मानाबाद नवीन लाईन (९५ किमी)
- वर्धा–नदिड (२८४ किमी),
- बडसा–गडचिरोली (५२ किमी),
- दौंड–मनामाड दुहेरीकरण (२३६ किमी),
- वर्षा–नागपूर तिसरी लाईन (७६ किमी),




- इटारसी–नागपूर तिसरी लाईन (२८० किमी),
- वर्धा–नागपूर चौथी लाईन (७९ किमी),
- भुसावळ–खंडवा तिसरी व चौथी लाईन (१३१ किमी),

महाराष्ट्रातील रेल्वे पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी ऐकून (५८,९४२ कोटी) रुपयांचे प्रकल्प प्रस्तावित आहेत. मुंबई मेट्रोच्या विस्तारासाठी १७०२ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. तर उपनगरी रेल्वेच्या सुधारणेसाठीही अर्थसंकल्पात मोठा वाटा ठेवण्यात आला आहे. मुंबई लोकलचा एमयुटीपी ३ अंतर्गत सुमारे ४०० किमी प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत. लोकलची गर्दी कमी करण्यासाठी नवीन ६वी लाईन टाकली जात आहे. स्टेशन्स उभारली जात आहेत. तसेच १०० नवीन साध्या लोकल ट्रेन्सचे नियोजन केले जात आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेवर १५ डब्याच्या गाड्यांच्या फेऱ्या वाढवण्यासाठी नियोजन केले जात आहे. मुंबईकरांसाठी नवीन एसी ट्रेन्स आणल्या जाणार आहेत. एकूण मुंबईकरांचा प्रवास सुखमय करण्यासाठी केंद्र सरकारकडून बजेटच्या माध्यमातून अनेक प्रकल्पांना पाठिंबा देण्यात आला आहे.

**(श्री. मंत्री हे चिकित्सा प्रकोष्ठचे मुख्य प्रवक्ता तथा मुख्य प्रदेश समन्वयक आहेत.)**

# अमेरिकेबरोबरच्या करारामुळे भारताचा फायदाच होणार

● दयानंद नेने

> संसदेत राहुल गांधी यांनी भारत-अमेरिका व्यापार व शुल्क करारावर सरकारवर जोरदार हल्ला चढवला. भारत माता विकली, शेतकऱ्यांना चिरडण्यासाठी दरवाजे उघडले, शुल्क ३ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत सहापट वाढले. अशी बिनबुडाची माहिती राहुल गांधींनी आपल्या भाषणात दिली.

**या** निमित्ताने मराठी मीडिया किती पक्षपाती आहे ते पुन्हा दिसून आले. कोणी काय बोलतोय – विषय काय आहे, बोलतो काय आहे, मुद्दे विषयाशी सुसंगत आहेत की नाहीत. काही बघायचे नाही. मोदी आणि भाजपा विरुद्ध बोलतोय ना मग निलेश खरे, प्रशांत कदम प्रभूती खूष. परंतु भावनांपेक्षा वस्तुस्थिती अधिक महत्त्वाची असते. आणि या संपूर्ण मुद्द्याकडे शांत, तर्कशुद्ध आणि आकडेवारीवर आधारित दृष्टीकोनातून पाहिल्यास चित्र वेगळे दिसते.

### शुल्क ३% वरून १८% झाले – वास्तव काय?

राहुल गांधी यांनी सांगितले की अमेरिकेचे शुल्क सरासरी ३% वरून १८% झाले, म्हणजे सहापट वाढ. ही तुलना दिशाभूल करणारी आहे.

● ३% हे MFN (Most Favoured Nation)चे बेसलाइन दर होते, जे WTO - World Trade Organisation - मधील सर्व देशांना लागू होते.

● २०२५ मध्ये डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने reciprocal tariffs आणि रशियन तेल खरेदीवर २५% दंडात्मक शुल्क लावले. त्या काळात शुल्क काही उत्पादनांवर ५०% पर्यंत गेले होते.

### १८ % वाढ – नक्की काय?

● या १८ % टॅरिफचा अर्थ असा नाही की अमेरिकेने सर्व आयातींवर आपला जागतिक व्यापार संघटनेचा सर्वाधिक प्राधान्य असणाऱ्या देशांसाठीचे आयात शुल्क (एमएफएन टेरिफ) ३% कडून १८% केले आहे.

### येथे जो बदल घडला आहे ते आहे

● अमेरिका आणि भारत यांच्यात नवीन द्विपक्षीय (bilateral) व्यापार कराराच्या संदर्भात – अमेरिकेने भारतीय मालावरून पूर्वीच्या अधिक टॅरिफ अथवा दंडात्मक टॅरिफ (खास धोरणात्मक शुल्क) कमी करून तो दर १८% केला आहे.

### याचा अर्थ असा नाही की

● हे थेट WTO - MFN नियम बदलले आहेत किंवा भारतास MFN सवलत कमी देण्यात आली आहे.

### हा द्विपक्षीय करार/निरनिराळ्या टॅरिफ धोरणाचा भाग आहे, MFN चे सार्वत्रिक दर नाहीत.

● या पार्श्वभूमीवर नव्या कराराने शुल्क स्थिर १८% वर आणले, म्हणजेच अनिश्चिततेतून स्थैर्याकडे वाटचाल झाली.

### पुन्हा नीट समजून घ्या

● अमेरिकेचे बेस MFN दर ३ %.

● परंतु २०२५ मध्ये अमेरिका काही देशांवर (भारतासह) reciprocal tariffs / additional levies लागू करत होती ज्यामुळे भारतास थेट २५–५० % पर्यंत टॅरिफ लागू झाले होते.

**हे MFN दर नव्हते – हे विशेष धोरणात्मक (reciprocal/penalty) टॅरिफ होते.**

● आता २०२६ च्या करारात हे जादाचे टॅरिफ कमी करून १८ % करार केला गेला आहे.

● आंतरराष्ट्रीय व्यापारात स्थैर्य आणि अंदाजपत्रकता (predictability) ही उद्योगांसाठी अत्यंत महत्त्वाची असते. ५०% पर्यंत झेपावणाऱ्या अनिश्चित शुल्कांपेक्षा निश्चित १८% दर उद्योगांसाठी अधिक सुरक्षित आहेत. त्यामुळे सहापट वाढ ही तुलना पूर्ण चुकीची केलेली आहे.

### अमेरिकन आयात ४६ अब्जवरून १४६ अब्ज डॉलर – हे खरंच नुकसान आहे का?

राहुल गांधी यांनी हा आकडा absurd म्हटला. पण कोणत्याही वाढत्या अर्थव्यवस्थेत आयात-निर्यात वाढणे स्वाभाविक असते.

● भारत आज जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे.

● ऊर्जा, तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर्स, एआय, संरक्षण उपकरणे यांसारख्या क्षेत्रांत अमेरिका आघाडीवर आहे.

● जर भारत ५०० अब्ज डॉलरचे ऊर्जा व तंत्रज्ञान उत्पादन खरेदी करणार असेल, तर त्यातून ऊर्जा सुरक्षितता, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि रोजगारनिर्मिती साध्य होऊ शकते.

ही कमिटमेंट नसून रणनीतिक गुंतवणूक – strategic investment आहे. चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि उच्च-तंत्रज्ञान क्षेत्रात झेप घेण्यासाठी अशा भागीदारी गरजेच्या आहेत.

### शेतकरी संकटात – प्रत्यक्षात काय तरतुदी आहेत?

कृषी क्षेत्र भारताच्या GDP च्या सुमारे २०% आहे आणि त्याची किंमत ५८० ते ६५० अब्ज डॉलर इतकी आहे. त्यामुळे हे क्षेत्र राजकीयदृष्ट्या संवेदनशील आहे, यात शंका नाही.

### परंतु

● वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी स्पष्ट केले की, स्वयंपूर्ण (self-sufficient) आणि संवेदनशील क्षेत्रांवर कोणतीही सवलत दिलेली नाही.

● सुरुवातीला प्रसिद्ध झालेल्या अमेरिकन फॅक्टशीटमध्ये 'certain pulses' हा उल्लेख होता, जो नंतर हटवण्यात आला. याचा अर्थ भारताने डाळींसारख्या संवेदनशील पिकांबाबत सावध भूमिका घेतली आहे.

● करार पूर्णपणे बाजार उघडणारा नसून टप्प्याटप्प्याने आणि निवडक क्षेत्रांपुरता मर्यादित आहे.

भारतीय शेतकरी केवळ संरक्षणावर नव्हे, तर स्पर्धात्मकतेवर टिकू शकतात. २०१४ नंतर कृषी निर्यात विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. तांदूळ, साखर, मसाले, फळे-भाज्या यांची जागतिक बाजारपेठेत मागणी वाढली आहे. त्यामुळे राहुल गांधी यांचे 'शेतकऱ्यांना चिरडण्याचे' विधान धादांत खोटे आहे.

### भारत माता विकली – राजकारण की वास्तव?

अशा प्रकारचे विधान भावनिक असते, परंतु जबाबदार विरोधी पक्षनेत्याकडून तथ्याधारित चर्चा अपेक्षित असते.

जर प्रत्येक व्यापार करार देशविक्री असेल, तर:

● १९९१ चे उदारीकरण काय होते?

● WTO मध्ये प्रवेश का घेतला?

● UPA सरकारने केलेले अणुकरार, मुक्त व्यापार करार हे काय होते? देशविक्री?

जागतिक अर्थव्यवस्थेत एकाकी राहून प्रगती होत नाही. आज भारत G20 चे नेतृत्व करतो, ग्लोबल साऊथचा आवाज बनतो, आणि जगातील पुरवठा साखळीचा (supply chain) महत्त्वाचा भाग आहे.

### मोठे चित्र – भारताची स्ट्रॅटेजिक स्थिती

भारत-अमेरिका संबंध केवळ व्यापारापुरते मर्यादित नाहीत. संरक्षण, सेमीकंडक्टर उत्पादन, स्वच्छ ऊर्जा, अवकाश संशोधन, एआय, सायबर सुरक्षा अशा अनेक क्षेत्रांत सहकार्य वाढत आहे.

● चीनच्या वाढत्या प्रभावाला शह देण्यासाठी भारत-अमेरिका भागीदारी निर्णायक आहे.

● मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या धोरणांतर्गत परकीय गुंतवणूक आकर्षित करणे आवश्यक आहे.

● स्थिर आणि संतुलित व्यापार करार हे दीर्घकालीन आर्थिक सुरक्षेसाठी महत्त्वाचे असतात. ■

# भारत-अमेरिका व्यापार करारामुळे शेतक-यांचा फायदाच होणार

**भारत** आणि अमेरिका यांच्यात होऊ घातलेला द्विपक्षीय व्यापार करार हा सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. काही वर्गांमध्ये या करारामुळे भारतीय शेतकरी, लघुउद्योग किंवा देशांतर्गत बाजाराला फटका बसेल का, अशी भीती व्यक्त केली जात आहे. मात्र केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत या सर्व शंकांना ठाम आणि तथ्यपूर्ण उत्तर दिले आहे. पीयूष गोयल म्हणतात, भारत गेली ५,००० वर्षे व्यापार करत आहे. आपल्याला अधिक मजबूत व्यापार करारांची गरज आहे. अशा करारांमुळे निश्चितता येते आणि देशात गुंतवणूक वाढते. हे विधानच या कराराची दीर्घकालीन दिशा स्पष्ट करते.

### भारतीय शेतमालासाठी ऐतिहासिक संधी

भारत–अमेरिका इढ अंतर्गत अनेक भारतीय उत्पादनांना अमेरिकेत शून्य टक्के आयात शुल्क (०% टॅरिफ) मिळणार आहे. यामध्ये– भारतीय मसाले, चहा, कॉफी, काजू, खोबरे, खोबरेल तेल, तीळ, बार्ली, आंबा, केळी, अननस, कीवी, ॲव्होकॅडो, मशरूमसारखी फळे–भाज्या प्रक्रिया केलेली फळे, अननस जॅम, रेशीम उत्पादने, रत्ने, औषधे, स्मार्टफोन यांचा समावेश आहे.

- याचा थेट फायदा भारतीय शेतकरी, प्रक्रिया उद्योग आणि निर्यातदारांना होणार आहे. जागतिक बाजारात भारतीय कृषी उत्पादनांना मोठी मागणी असताना, ०% टॅरिफमुळे भारतीय शेतमाल अधिक स्पर्धात्मक ठरणार आहे.

### शेतकऱ्यांच्या हिताला धक्का नाही – स्पष्ट भूमिका

या कराराबाबत सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे भारतीय शेतकऱ्यांच्या विरोधात एकही तरतूद करण्यात आलेली नाही. GM² (जेनेटिकली मॉडिफाईड – जनुकीय बदल केलेली) उत्पादने भारतात आयात करण्यास परवानगी देण्यात आलेली नाही. दूध, दुग्धजन्य पदार्थ, मांस, कुक्कुटपालन, धान्ये, डाळी, फळे, मध, तंबाखू, ग्राउंडनट, इथेनॉल, पेये, अत्यावश्यक इंधन अशा संवेदनशील क्षेत्रांमध्ये अमेरिकेला कोणतीही सवलत दिलेली नाही. सोया, तांदूळ आणि गहू: हे अत्यंत संवेदनशील वस्तू म्हणून वर्गीकृत आहेत. अमेरिकेला यावर कोणत्याही कर सवलती देण्यात आलेल्या नाहीत. म्हणजेच, भारतीय शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सुरक्षित ठेवूनच हा करार करण्यात आला आहे.

### एमएसएमई, हातमाग आणि हस्तकला क्षेत्रासाठीही संरक्षण

काहींना भीती आहे की परदेशी उत्पादने स्वस्त दरात आल्याने भारतीय लघु–मध्यम व सुक्ष्म उद्योग, हातमाग व हस्तकला उद्योग अडचणीत येतील. मात्र मंत्री गोयल यांनी स्पष्ट केले आहे की हा करार शेतकरी, लघु–मध्यम व सुक्ष्म उद्योग, हस्तकला आणि हातमाग क्षेत्राच्या हिताविरोधात नाही. उलट, भारतीय हस्तकला, रेशीम, जेम्स–ज्वेलरीसारख्या उत्पादनांना अमेरिकेत मोठी बाजारपेठ मिळणार आहे.

### भारताला काय मिळणार ?

या करारातून भारताला केवळ कृषी निर्यातच नव्हे तर– सेमीकंडक्टर्स, अत्याधुनिक तंत्रज्ञान, विमान व एरोस्पेस उत्पादने यामध्ये प्रवेश मिळणार आहे. यामुळे 'मेक इन इंडिया','आत्मनिर्भर भारत' आणि उच्च तंत्रज्ञान उत्पादनांना गती मिळेल.

### संतुलित आणि आत्मविश्वासपूर्ण करार

भारताने अमेरिकेला काही क्षेत्रांत–जसे मद्य (किमान आयात किंमतीसह), सौंदर्यप्रसाधने, वैद्यकीय उपकरणे, रसायने, संगणक उत्पादने–मर्यादित सवलती दिल्या आहेत. मात्र हे करताना देशांतर्गत उद्योग, शेतकरी आणि अन्नसुरक्षेवर कोणताही परिणाम होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली आहे. ■

# ब्रॅण्ड देवाभाऊ



● आनंद देवधर

नुकत्याच पार पडलेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपाने लक्षणीय यश मिळवले आहे. महायुतीने बहुमत मिळवूनही विजयाला छोटे दाखवण्याचे प्रयत्न सुरू असले तरी असे प्रयत्न करणाऱ्यांकडे लक्ष देऊ नये. मुंबईमध्ये ठाकरेच असे वातावरण मराठी मीडियाने निर्माण केले होते. भाजपला मराठीद्वेष्टा ठरवण्याचा आटोकाट प्रयत्न केला गेला.

**देवेंद्र फडणवीस नेहमी म्हणत असतात...**

**तुम्ही म्हणजे मुंबई नाही**
**तुम्ही म्हणजे महाराष्ट्र नाही**
**तुम्ही म्हणजे मराठी माणूस नाही.**

**मुंबईचा** विकास कसा करणार याविषयी कोणताही रोडमॅप नसलेले मुंबईते ठाकरे बंधू आणि नागपूरमध्ये जन्म झालेले देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईसाठी केलेले अथक प्रयत्न यात काय निवडायचे हे समजण्याइतपत मुंबईकर सुज्ञ होता. मराठी मतदारांचा मोठा टक्का प्रथमपासूनच भाजपच्या मागे आहे असे नसते तर गेल्या तिन्ही विधानसभा निवडणुकीत भाजपचे सर्वात जास्त आमदार निवडून आले नसते.

**आता जिंकलेल्या नगरसेवकांची आकडेवारी बघू**

भाजपच्या एकूण ८९ नगरसेवकांपैकी ५४ मराठी आहेत १४ गुजराती आहेत आणि १० उत्तर भारतीय

आहेत. उरलेले इतर भाषिक. भाजप हा गुजरात्यांचा आणि भैय्यांचा पक्ष आहे अशी बिनडोक टीका करणाऱ्या लोकांच्या तोंडावर ही आकडेवारी फेकून मारा. फडणवीस यांनी एवढा आटापिटा करून काय मिळवले तर फक्त सात नगरसेवक जास्त निवडून आणले असे कुजकटपणे त्यांना हिणवले जात आहे यात ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर आणि प्रकाश अकोलकर यांचा समावेश आहे.

२०१७ साली भाजपाने २१७ जागा लढवून ८२ जिंकल्या होत्या यंदा १३७ जागी लढून ८९ जिंकल्या आहेत. कमी जागा लढवूनही जास्त जागा जिंकणे याला यश म्हणतात. परंतु गणितात कच्चे असलेले हे मान्य करणार नाही. एक गोष्ट मात्र मान्य करायला पाहिजे अपेक्षेपेक्षा भाजपला १२ ते १५ जागा कमी मिळाल्या आहेत. भाजपने ५०० पेक्षा कमी फरकाने हरलेल्या जागांची एकूण संख्या १० च्या जवळपास असावी. ८९ जागा जिंकणाऱ्या भाजपचे तथाकथित अपयश आणि १०० जागा जिंकण्याचा पराक्रम यात फार थोडे अंतर होते.

भाजपने जागा वाटपात काही इतर समीकरणांसाठी शिवसेनेला झुकते माप दिले अशी चर्चा होत होती. शिवसेनेच्या वाट्याला आलेल्या २० ते २५ जागा भाजपाने लढवल्या असत्या तर कदाचित चित्र वेगळे दिसले असते. अर्थात जर तरला अर्थ नसतो. निवडणुकीचे नेतृत्व देवेंद्र फडणवीस यांनी सक्षमपणे केले. आशिष शेलार आणि अमित साटम या दोन सहकाऱ्यांना बरोबर घेऊन त्यांनी मुंबईच्या प्रत्येक वॉर्डाचा अभ्यास करून निवडणूक जिंकली आहे. हे तिघेही मराठी आहेत हे महत्त्वाचे.

पहिल्या टर्ममधील मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांनी पाठीत खंजीर खुपसल्यानंतरचे देवेंद्र फडणवीस या दोन पूर्णपणे वेगळ्या व्यक्ती आहेत. रोज उठून फडणवीस यांनी केलेल्या राजकारणाचा निषेध करणारे, त्यांना कमकुवत नेते म्हणून टीका करणारे काही समर्थक आपल्याला दिसून येतात.

### 'राजकारणात मरायचे नसते'

हे फडणवीस यांचे वाक्य सगळ्यांनी कायमचे लक्षात ठेवा. २०२३ साली मी जे केले त्याचे परिणाम तुम्हाला तीन-चार वर्षांनी दिसून येतील असे त्यांनी म्हणून ठेवले आहे. याचा अर्थ त्यांच्या डोक्यात लॉंग टर्म प्लॅन आहे. शॉर्ट टर्म विचार करणाऱ्यांना हे समजणार नाही. इथेच ते



फडणवीस यांना समजण्यात चूक करतात. फडणवीस यांनी आपल्याला दगा देणाऱ्या शरद पवार आणि उद्धव ठाकरे या दोघांचा पुरेपूर बदला घेतला त्याला तोड नाही. या काळात परिस्थितीनुसार फडणवीस यांची नव्याने ओळख निर्माण झाली. ही त्यांची ओळख विरोधकांच्या छातीत धडकी भरवणारी आहे. आज ते महाराष्ट्राचे आणि भाजपचे नेतृत्व करत आहेत.त्यांचे विकासाचे मॉडेल राज्यातील लोकांना भावले आहे. ते वाचाळपणा करत नाहीत, जमिनीवर काम करून दाखवतात. त्याची उजळणी करण्याची गरज नाही आपल्या सगळ्यांना ते माहीत आहे. मोदींच्या स्वप्नातील भारत साकारण्यात देवेंद्र फडणवीस यांचा मोठा सहभाग आहे, असेल आणि असायलाच हवा. आता ट्रिपल इंजिन सरकार आहे. मुंबईवरील आपली पकड देवेंद्र फडणवीस पुढील पाच वर्षात अजूनच घट्ट करतील यात माझ्या मनात कोणतीही शंका नाही.

काही महिन्यांपूर्वी सर्व वर्तमानपत्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी फुले वाहणारे देवेंद्र फडणवीस झळकले होते. त्यात त्यांचा देवाभाऊ असा उल्लेख करण्यात आला होता. फडणवीसांचे ब्रँडिंग करण्याचा तो यशस्वी प्रयत्न होता. आज लहान थोरांपासून सगळेच त्यांचा उल्लेख देवाभाऊ असा करतात. ब्रॅण्ड ठाकरेचे कितीही ढोल पिटा महाराष्ट्रात आज ब्रॅण्ड देवाभाऊ नंबर वन आहे आणि पुढील काही वर्षे तो तिथेच राहणार आहे. ■

# पंगा भारताशी, ट्रम्प तोंडघशी!



● **डॉ. शैलेंद्र देवळाणकर**, परराष्ट्र धोरण विश्लेषक

> 'ग्लोबल पोलिसमन' असल्याच्या आविर्भावातून ट्रम्प यांनी भारताबाबतही प्रेशर टॅक्टीस अवलंबल्या. परंतु ते अक्षरशः तोंडावर आपटले. भारताशी पंगा घेऊन ते पूर्णतः फसले. अमेरिकेचा अहंकार गळून पडला. याचे कारण त्यांना याची कल्पनाच राहिलेली नाही की, हा एकविसाव्या शतकातील भारत आहे, तो दबावाला बळी पडणार नाही.

**केंद्रीय** अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग नवव्यांदा 'विकसित भारत २०४७' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्त्वाकांक्षी मिशनचा पाया भक्कम करणारा अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी संसदेत सादर केला. या अर्थसंकल्पाला काही तास उलटताच तोच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर आकारण्यात येत असलेले २५ टक्के टॅरिफ १८ टक्क्यांवर आणण्यात येत असल्याचे जाहीर केले. तसेच रशियाकडून तेलआयातीबाबत भारतावर लादलेले २५ टक्क्यांचे अतिरिक्त दंडात्मक आयात शुल्कही घटवण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतासाठी विशेषतः भारतीय निर्यातदार, उद्योजक, गुंतवणूकदार यांच्यासाठी ट्रम्प यांनी दिलेला हा सुखद धक्का होता. याचे कारण आशिया खंडातील इतर देशांच्या तुलनेत भारतावर अमेरिकेकडून आकारण्यात येणारे प्रस्तावित टॅरिफ हे कमी झाल्याने भारतीय निर्यातदारांना अमेरिकेत मालाची निर्यात करण्यामध्ये अधिक संधी मिळणार आहेत. सद्यस्थितीत अमेरिकेला सर्वाधिक निर्यात करणारा देश असणाऱ्या चीनवर ट्रम्प यांनी ३६ टक्के टॅरिफ आकारणी सुरू केलेली आहे. बांगलादेश व इंडोनेशिया हे दोन्ही देशही अमेरिकेमध्ये वस्तू विकण्याबाबत भारताचे स्पर्धक आहेत. या देशांवरील टॅरिफही १८ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. ट्रम्प राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर भारताचा शेजारी असणारा पाकिस्तान अमेरिकेच्या गुड बुकमध्ये गेल्याचे दिसत असले तरी त्यांच्यावरील टॅरिफ




शुल्कही सध्या १९ टक्के आहे. या सर्व देशांच्या तुलनेत अमेरिकेकडून कमी टॅरिफ आकारणी झाल्यास भारतीय वस्तूंना स्पर्धात्मक पातळीवर निश्चितच चांगली संधी मिळणार आहे. टॅरिफमधील हा सुखद दिलासा देतानाच ट्रम्प यांनी आणखी एक घोषणा केली आहे. त्यानुसार भारत आता रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी थांबवेल आणि व्हेनेझुएलाकडून तेलखरेदी करेल. प्रसंगी अमेरिकेकडूनही भारत तेलाची आयात वाढवू शकतो. येत्या काळात भारत ५००अब्ज डॉलर्सच्या वस्तू व सेवांची खरेदी अमेरिकेकडून करेल, असेही ट्रम्प यांनी म्हटले.

### ट्रम्प यांनी टॅरिफ घटविण्याची घोषणा करणे हा भारताचा विजय

अमेरिकेच्या या निर्णयाला प्रतिसाद देताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेले प्रतिसादात्मक उत्तर अतिशय चपखल आणि परराष्ट्र धोरणामध्ये शब्दांचा वापर किती अचूकपणाने करावा लागतो, याचे उदाहरण ठरणारे होते. मोदी यांनी असे म्हटले की, माझे मित्र डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर आकारण्यात येणारे आयात शुल्क ५० टक्क्यांवरुन १८ टक्के केले, याचा मला खूप आनंद झाला. यामुळे दोन देशातील संबंध बळकट होतील. तथापि, पंतप्रधानांनी कुठेही या ट्विटमध्ये भारत रशियाकडून तेलखरेदी थांबवेल असे म्हटलेले नाही. ५०० अब्ज डॉलर्सच्या वस्तूंची अमेरिकेकडून करण्याचाही उल्लेख पंतप्रधान मोदींनी केलेला नाही. या सर्व घोषणा ट्रम्प प्रशासनाकडून एकतर्फी केल्या जात आहेत. कालपरवापर्यंत भारतावर ५०० टक्के ३ टैरिफ आकारले जाऊ शकते, अशी धमकी देणाऱ्या ट्रम्प यांना स्वतः हे टॅरिफ १८ टक्के करत असल्याची घोषणा करावी लागणे, हा भारताचा मोठा विजयच म्हणावा लागेल.

### भारताची 'स्ट्रॅटॅजिक सँगॅसिटी'

भारताने एप्रिल २०२५ पासून व्यापार रणनीती सुधारण्यावर भर दिला. याला 'स्ट्रॅटॅजिक सँगॅसिटी' असे म्हटले जाते. अमेरिकन वाढीव टॅरिफमुळे जेम्स अँड ज्वेलरी, ऑटो पार्टस्, लेदर इंडस्ट्रीज, कृषी, फिशरीज, डेअरी उद्योग यामधील सुमारे ३२ अब्ज डॉलरचा व्यापार प्रभावित झाला होता. ही सर्व क्षेत्रे श्रमिकप्रधान आणि एमएसएमईचा अधिक समावेश असणारी असल्याने त्यांना दिलासा देणे गरजेचे होते. भारताने इंग्लंड, युरोपियन महासंघ, ऑस्ट्रेलिया, ओमान, न्यूझीलंड या देशांबरोबर मुक्त व्यापार करारात आघाडी घेतली. युरोपियन महासंघासोबतचा करार हा मदर ऑफ ऑल डील म्हणून ओळखला जातो. याचे कारण युरोपची ५० कोटी श्रीमंत लोकांची बाजारपेठ भारतासाठी खुली झाली. विमा, श्रमसंहिता, अणुकायद्यातील सुधारणा याबरोबरीने पंतप्रधानांनी सातत्याने स्वदेशीचे आवाहन देशातील १४४ कोटी नागरिकांना केले.

### अमेरिकेचा अहंकार गळाला

दबाव टाकणे, सौदेबाजी करणे, अनपेक्षित निर्णय घेऊन समोरच्या व्यक्ती अथवा राष्ट्राला सतत धक्के देत राहणे, अस्थिर ठेवणे आणि या सर्वांतून प्रतिपक्षाकडून जास्तीत जास्त सवलती व नफा पदरात पाडून घेणे ही ट्रम्प यांची कार्यपद्धती आहे.

### भारत दबावापुढे झुकला नाही

जपानवर आधी प्रचंड टॅरिफ लावला. नंतर दबाव टाकून जपानसोबत व्यापार करार केला. त्यानंतर इंडोनेशिया, युरोपियन देशांबाबतही ट्रम्प यांनी हीच नीती अवलंबली. परंतु भारत हा एकमेव देश असा होता जो ट्रम्प यांच्या दबावाला बळी पडला नाही.■

# व्यापार करारातून स्थैर्याकडे...



● राजेश अग्रवाल

> भारत आणि युरोपीय महासंघात झालेला मुक्त व्यापार करार हे जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चिततेच्या आणि अस्थिर वातावरणात विस्तारित बाजारपेठ मिळवण्यासाठी टाकलेले अतिशय महत्त्वाचे पाऊल आहे. यातून दोन्ही बाजूंमध्ये अधिक निकटचे आर्थिक संबंध प्रस्थापित होतील आणि धोरणात्मक स्वायत्तताही प्राप्त होईल.

**भारताचे** युरोपशी पूर्वापार म्हणजे अगदी रेशीम मार्गाच्याही आधीपासून समृद्ध व्यापारी संबंध आहेत. त्यांना इ.स.पू. २५० पासूनचा इतिहास आहे. त्यानंतरच्या दोन हजार वर्षांच्या काळात, भारतीय मलमल, कापूस, हस्तकलेच्या वस्तू, मसाले, पाचू आणि रत्ने या वस्तूंना आंतरराष्ट्रीय व्यापारात सर्वाधिक मागणी होती. या वस्तूंचा बराचसा हिस्सा युरोपमध्ये जात असे. या अनोख्या वस्तूंच्या बदल्यात भारतात सोने आणि चांदीचा ओघ येत असे. ऐन भरभराटीच्या कालखंडात भारत आणि युरोपातील व्यापाराच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली होती.

२००७ मध्ये सर्वंकष मुक्त व्यापार कराराच्या रूपाने हे संबंध बळकट करण्याचे प्रयत्न सुरू झाले. मात्र अनेक मुद्द्यांवर दोन्ही बाजूंनी घेतलेल्या भूमिकेत गंभीर मतभेद असल्याने २०१३ मध्ये वाटाघाटी थांबवाव्या लागल्या. २०२२ मध्ये या वाटाघाटी पुन्हा सुरू झाल्या आणि प्रचंड मोठी आणि गुंतागुंतीची आव्हाने असतानाही, दोन्ही बाजूंच्या नेत्यांची दृढ वचनबद्धता आणि दूरदर्शी नेतृत्वामुळेच त्या वाटाघाटी पूर्णत्वास येऊ शकल्या. महत्त्वाचे म्हणजे, दोन्ही बाजूंच्या वाटाघाटीअंती झालेला व्यापार करार वाढत्या नाजूक जागतिक आर्थिक व्यवस्थेत नियमांवर आधारित व्यापार संबंधांच्या गरजेचा ठामपणे पुनरुच्चार करणारा आहे. हा करार केवळ विषय आणि शाखांच्या विस्तारामुळे आणि सखोलतेमुळेच नव्हे, तर दोन्ही बाजूंना एकाच वेळी गहन मुद्द्यांवरही समान पातळी गाठायची असल्यानेही ऐतिहासिक ठरतो.

### सर्वांत फलदायी करार

भारत आणि युरोपीय महासंघादरम्यान झालेला मुक्त व्यापार करार (भारत– ईयू एफटीए) हा बहुधा अलीकडच्या काळात झालेला सर्वांत फलदायी व्यापार करार असावा. ज्यामध्ये जवळपास दोन अब्ज लोक आणि २८ देशांसह जागतिक जीडीपीच्या २५ टक्के हिस्सा सामावलेला आहे असे जगातील एक सर्वांत मोठे मुक्त व्यापार क्षेत्र निर्माण करण्याची त्यामध्ये क्षमता आहे. याशिवाय समस्या आणि चिंतेच्या विषयांकडे पाहण्याचा या करारातील दृष्टिकोन



आधुनिक आणि नवीन आहे. या करारात अद्ययावत आणि मूलभूत स्वरूपाच्या शाखांचा अंतर्भाव आहे, तसेच व्यापार संबंध अधिक दृढ करण्यासाठी प्रक्रियात्मक तरतुदी आहेत. हा करार वस्तू आणि सेवा दोन्हीसाठी बाजारपेठेची उपलब्धता आणि नियामक अडथळ्यांना तोंड देण्याच्या दृष्टीने नवीन नमुना आखून देणारा ठरणारा आहे, त्याचबरोबर पारंपरिक शाखांना नावीन्यपूर्ण घटकांसह भक्कम आधार देणारा आहे. उदाहरणार्थ, 'रुल्स ऑफ ओरिजिन' या प्रकरणात, भागीदार देशांमध्ये लक्षणीय प्रमाणात प्रक्रिया केलेली उत्पादने किंवा भागीदार देशांतील उत्पादनालाच 'कंट्री ऑफ ओरिजिन' म्हणून मान्यता दिली जाईल हे सुनिश्चित केले आहे.

वर्तमान आणि नवीन पुरवठा साखळ्यांशी सुसंगत तपशीलवार आणि बारकाईने आखलेल्या उत्पादन-विशिष्ट नियमांद्वारे हे साध्य होऊ शकते. याव्यतिरिक्त, हा करार तंत्रज्ञान हस्तांतर आणि माहिती प्रवाहाला प्रोत्साहन देण्यावर अधिक लक्ष केंद्रित करून बौद्धिक संपदा संरक्षणाची पुनरावृत्ती करतो.

### बाजारपेठा खुल्या करणे

आपली विस्तृत आणि व्यापक बाजारपेठ एकमेकांसाठी खुली करणे हा कराराचा महत्त्वाचा उद्देश आहे. हा करार भारताच्या ९९ टक्क्यांहून अधिक निर्यात व्यापारासाठी मूल्यानुसार बाजारपेठ उपलब्ध करून देतो, कराराची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर त्यापैकी किमान ९० टक्के भारतीय निर्यातीला शुल्कात तात्काळ सूट मिळणार आहे. कापड आणि कपडे, चामड्याच्या वस्तू, रत्ने आणि दागिने, लाकूड आणि लाकडी कोरीव कामाच्या वस्तू तसेच सागरी उत्पादने यासारख्या श्रम-केंद्रित वस्तूंना त्वरित लाभ मिळतील. यामुळे रसायने, इलेक्ट्रॉनिक्स, कृषी-प्रक्रिया उद्योग आणि खनिजे यासारख्या क्षेत्रांतील उद्योगांना ईयूसारख्या चैतन्यशील बाजारपेठेतील त्यांच्या निर्यातीत वैविध्य आणता येऊ शकेल.

भारताने ईयूच्या वाहन उद्योगाला बाजारपेठ प्रवेशाची मुभा दिली असली तरी, ती आयात शुल्क दराच्या कोट्याद्वारे टप्प्याटप्प्याने दिली जाणार आहे. त्याचप्रमाणे, ईयूमधील वाइनच्या आयातीला भारताने दिलेल्या सवलतींमागे महाग किमतीच्या वस्तू विभागांमध्ये स्पर्धेला प्रोत्साहन देतानाच देशांतर्गत उद्योगाच्या हिताचे रक्षण करण्याचाही प्रयत्न केला गेला आहे.

भारत-ईयू व्यापार संबंधांमध्ये सेवा व्यापाराला लक्षणीय वाव आहे. करारांतर्गत ईयूने भारताला १४४ सेवा



क्षेत्रांबाबत आश्वासन दिले असून हे प्रमाण अभूतपूर्व आहे. याव्यतिरिक्त, मोबिलिटी म्हणजेच व्यावसायिकांच्या आदान-प्रदानासंबंधीच्या प्रकरणात, व्यावसायिक आणि कंत्राटी सेवा पुरविणाऱ्यांना तात्पुरता प्रवेश आणि वास्तव्य करणे अधिक सोपे आणि अधिक खात्रीशीर होईल याची खातरजमा करण्यात आली आहे. याचा अर्थ असा की यामुळे भारतातील प्रतिभावंत सेवा व्यावसायिकांना ईयूच्या बाजारपेठेत जम बसविणे शक्य होईल. वित्तीय सेवांवरील परिशिष्टात भारत आणि ईयू दरम्यान इलेक्ट्रॉनिक पेमेंट सिस्टीमबाबत अधिक संबंध वाढविण्याची सोय केली असून त्यामध्ये यूपीआयसारख्या डिजिटल पेमेंट सिस्टीममध्ये भारताच्या तांत्रिक कौशल्याचा लाभ करून घेण्याचा समावेश आहे. या करारात आयुष आणि पारंपरिक उपचारपद्धती व्यावसायिकांना ईयूमध्ये त्यांच्या सेवा अधिक खात्रीलायकपणे पुरविण्याचीदेखील तरतूद केली आहे.

### मुक्त आणि रास्त व्यापारात वाढ

दोन प्रमुख बाजारपेठांदरम्यानचे संबंध अधिक खुले, रास्त आणि परस्पर फायद्याचे होतील असा मुक्त व्यापार कराराचा प्रयत्न आहे. व्यापार आणि शाश्वत विकास या विषयावरील प्रकरणात पर्यावरणपूरकतेच्या मुद्द्यांवर सहकार्याचे एक नवीन मॉडेल मांडण्यात आले आहे. या प्रकरणात व्यापारात सहभागी पक्षांच्या कामगार किंवा पर्यावरणीय मानकांमध्ये सुसंवाद साधण्याचा प्रयत्न न करता, शाश्वत विकासाच्या उद्दिष्टाला त्यांच्या व्यापार संबंधांची पूर्णत: जोड दिली आहे. धोरणात्मक संवाद, तांत्रिक साहाय्य आणि आर्थिक साधने आणि संसाधनांचे एकत्रीकरण यावर लक्ष केंद्रित केले आहे. दोन्ही बाजूंनी जलद प्रतिक्रिया यंत्रणा, नियम उल्लंघनाशी संबंधित नसलेल्या तक्रारी आणि काही धोरणात्मक उपाययोजना किंवा उत्पादन-विशिष्ट उपाययोजनांबाबत त्यांच्या विशिष्ट समस्यांचे निवारण करतील अशा स्वतंत्र परिशिष्टांबद्दलदेखील वाटाघाटीतून मार्ग काढण्यात आला आहे.

काही प्रमुख भागधारकांच्या चिंता आणि संवेदनशील मुद्द्यांशी (दुग्धव्यवसाय आणि कृषी क्षेत्रे) कोणतीही तडजोड न करता बाजारपेठ खुली करण्याचा महत्त्वाकांक्षी उद्देश साध्य करणे हे खरे आव्हान होते. अल्पभूधारक आणि वंचित गटातील शेतकरी आणि काही उद्योग क्षेत्रांच्या उत्पन्न आणि उपजीविकेच्या प्रश्नांना आमचा अग्रक्रम होता. प्रामाणिकपणे सांगायचे तर, ईयूनेदेखील या संदर्भात आवश्यक लवचीकता दाखवली.

### भारताच्या मुक्त व्यापार धोरणाची जोड

पुरवठा साखळी विस्कळीत होण्याच्या या कालखंडात, भारत-ईयूमुक्त व्यापार करार हा भारत-यूकेमुक्त व्यापार करार, ईएफटीए आणि इतर व्यापक व्यापार करारांमुळे होणार्या फायद्यांसाठी पूरक आहे. २०२१ पासून, भारताने नऊ व्यापक व्यापार करार केले असून पुढील काही महिन्यांत अनेक प्रमुख आर्थिक भागीदारी करार पूर्ण करण्यासाठीच्या वाटाघाटी सुरू आहेत. पूर्णत्वास आलेला भारत-ईयू व्यापार करार भारताच्या नवीन आर्थिक आणि व्यापार संबंधांना गती देण्यासाठी उत्प्रेरक ठरेल.

भारत-ईयूमुक्त व्यापार करार हा विशेषत: जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चिततेच्या आणि अस्थिर वातावरणात विस्तारित बाजारपेठेची उपलब्धता, अधिक निकटचे आर्थिक संबंध, धोरणात्मक स्वायत्तता आणि लवचीकता प्राप्त करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. आर्थिक इतिहासकारांनी म्हटल्याप्रमाणे, जेव्हा देश निष्पक्ष, नियमाधारित, कायदेशीर चौकटीत व्यापार करतात तेव्हा आर्थिक समृद्धी साध्य होते. भारत-ईयूमुक्त व्यापार करारात हे काळाच्या कसोटीवर उतरलेले तत्त्व शिरोधार्य मानण्यात आले आहे. ■

# महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात घडतेय २,९०० कोटींची 'मूक क्रांती'

● मल्हार पांडे

**शेती** परवडत नाही, ही वाक्यरचना आता महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थकारणात परवलीची झाली आहे. वाढता उत्पादन खर्च, मजुरांची कमतरता आणि लहरी हवामान यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. मात्र, या निराशाजनक चित्राच्या पलीकडे जाऊन राज्याच्या कृषी क्षेत्रात एक 'मूक क्रांती' (Silent Revolution) आकाराला येत आहे. कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि ताज्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील शेती आता 'कष्टाकडून' 'स्मार्ट डेटा'कडे वळत असून, २०२३० पर्यंत हे चित्र पूर्णपणे बदलण्याची चिन्हे आहेत.

### इनपुट कॉस्टचे गणित

नफा वाढणार कसा? शेती तोट्यात जाण्याचे मुख्य कारण म्हणजे वाढलेला 'इनपुट कॉस्ट' (खते, बियाणे, पाणी, मजुरी). मात्र, 'फार्मोनॉट' (Farmonaut) आणि केंद्र सरकारच्या २०२५ च्या अहवालानुसार, तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांनी यावर प्रभावी उपाय शोधला आहे. ड्रोन (Drones) आणि सॉईल सेन्सर्स (Soil Sensors) यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे पिकांवर औषध फवारणी आणि खतांचा वापर यात १५% ते २०% कपात झाली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यासारख्या दुष्काळप्रवण भागात 'प्रिसिजन इरिगेशन'मुळे (Precision Irrigation) पाण्याची ३०% ते ४०% बचत होत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे. जेव्हा एकरी खर्च ५ ते १० हजार रुपयांनी कमी होतो, तेव्हा तोच शेतकऱ्याचा 'निव्वळ नफा' (Net Profit) ठरतो.

### ५८० कोटी ते २,९०० कोटी

अर्थकारणाची नवी दिशा ही क्रांती केवळ शेतापुरती मर्यादित नाही, तर ती रोजगाराची नवीन दारे उघडत आहे. २०२४ मध्ये भारतातील 'ग्री-टेक' (Agri-Tech) आणि 'AI in Agriculture' चे बाजारमूल्य ५८० कोटी रुपये इतके होते. इकॉनॉमिक सर्व्हे आणि मार्केट



रिसर्चनुसार, २०३३ पर्यंत हे मूल्य २,९०० कोटींच्या घरात जाण्याचा अंदाज आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे – भविष्यातील ग्रामीण महाराष्ट्रात ट्रॅक्टर दुरुस्त करणाऱ्या गॅरेजपेक्षा 'ड्रोन रिपेअर सेंटर' आणि 'डेटा नालिसिस लॅब'ची संख्या जास्त असेल. गुगल आणि मायक्रोसॉफ्टसारख्या जागतिक कंपन्यांनी महाराष्ट्रातील ग्री-स्टार्टअप्समध्ये रस दाखवणे, हे त्याचेच द्योतक आहे.

### तलाठी कार्यालयाला रामराम

'डिजिटल फार्मर आयडी' शासकीय पातळीवरही मोठे धोरणात्मक बदल होत आहेत. केंद्र सरकारने सप्टेंबर २०२४ मध्ये 'डिजिटल ग्रीकल्चर मिशन' (Digital Agriculture Mission) लाँच केले असून, त्यासाठी २,८१७ कोटींची तरतूद केली आहे. या अंतर्गत ६ कोटी शेतकऱ्यांना 'Farmer ID' देण्यात येत आहे. जमिनीचा ७/१२ उतारा, पीक विमा आणि कर्ज प्रकरणे यासाठी तलाठी कार्यालयात खेटे मारण्याचे दिवस आता संपणार आहेत. जमिनीचा सर्व डेटा एका 'क्लिक'वर उपलब्ध झाल्याने बँकांकडून कर्ज मिळणे सुलभ होणार आहे.

**निष्कर्ष :** दावोसमध्ये होणाऱ्या जागतिक चर्चांचे पडसाद आता महाराष्ट्राच्या बांधावर उमटू लागले आहेत. प्रश्न फक्त तंत्रज्ञान स्वीकारण्याचा नाही, तर मानसिकतेचा आहे. जे शेतकरी काळाची पावले ओळखून 'स्मार्ट शेती'कडे वळतील, तेच भविष्यात या २,९०० कोटींच्या अर्थव्यवस्थेचे वाटेकरी असतील. शेती आता केवळ 'अन्नदाता' राहिला नसून, तो एक'स्मार्ट उद्योजक' बनण्याच्या वाटेवर आहे. ■

# हवाई सामर्थ्यात भर

## फ्रान्सकडून ११४ राफेल, तर अमेरिकेकडून ६ पी-८ आय विमानांच्या खरेदीला भारताची मंजुरी, ३.६० लाख कोटींचा करार



**देशाच्या** संरक्षणासाठी सातत्याने आक्रमक, दमदार, जोरदार भूमिका घेणाऱ्या नव्या भारताच्या संरक्षण क्षमतांना अधिक बळकटी आणण्यासाठी फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमानांच्या खरेदी कराराला भारताच्या संरक्षण अधिग्रहण परिषदेने मंजुरी दिली. ३.६० लाख कोटी रुपयांच्या या महाकाय संरक्षण करारांतर्गत अमेरिकेकडून नौदलासाठी ६ पी-८ आय गस्ती विमाने आणि अन्य लष्करी उपकरणांची खरेदी केली जाणार आहे.

केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण संपादन परिषदेच्या (डीएसी) बैठकीत राफेल लढाऊ विमानांच्या खरेदीला अधिकृत मंजुरी देण्यात आली. भारतीय हवाई दलातील लढाऊ विमानांच्या स्क्वॉड्रनची संख्या ४२ वरून ३१ पर्यंत खाली आल्याने हवाई दलासमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. हे अंतर भरून काढण्यासाठी २०१९ पासून बहुआयामी लढाऊ विमानांच्या (एमआरएफए) खरेदीची प्रक्रिया सुरू होती. या शर्यतीत अमेरिकेचे लॉकहीड मार्टिन एफ २१, बोईंगचे एफ/ए-१८ आणि युरोफायटर टायफून यांसारखी विमाने होती. मात्र, भारताने पुन्हा एकदा 'राफेल' वरच विश्वास दर्शवला आहे. राफेलच्या खरेदीसंदर्भात विमानांमधील शस्त्रास्त्रांचे पॅकेज आणि इतर तांत्रिक बाबींवर फ्रान्सच्या 'दसॉल्ट एव्हिएशन' या कंपनीशी चर्चा केली जाईल. या प्रक्रियेला काही काळ लागणार असल्याने वर्षाच्या अखेरपर्यंत औपचारिक करारावर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे.

हा करार पूर्णत्वास गेल्यावर हवाई दलाच्या ताफ्यात सुमारे १५० राफेल लढाऊ विमाने असतील. तर नौदलात २६ कॅरिये-कंपॅटिबल राफेल विमानांचा समावेश होईल. या प्रस्तावाला १६ जानेवारी रोजी संरक्षण खरेदी मंडळाकडून मंजुरी मिळाली होती. आता कॅबिनेट समितीच्या अनुमतीनंतर अधिग्रहण प्रक्रिया पुढे जाईल. क्षेपणास्त्रे आणि टेहळणी यंत्रणांच्या खरेदीलाही मंजुरी मिळाली आहे.

उच्च-उंचीवरील छद्म उपग्रह (एएस-एचएपीएस) आणि इतर खरेदींना मंजुरी दिली. ज्याचा अंदाजे खर्च ३.६ लाख कोटी रुपये आहे. परिषदेने या खरेदीची गरज असल्याची

मान्यताही मंजूर केली, ज्यामुळे राफेलसारखी बहुउद्देशीय विमाने आपले संरक्षण आणि हल्ला यातील हवाई वर्चस्व कैकपटीने वाढवतील. देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी यातील बहुतेक विमाने भारतात उत्पादित होण्याची अपेक्षा आहे.

प्रगत लढाऊ क्षेपणास्त्रांच्या समावेशामुळे जमिनीवरून शत्रूप्रदेशात अगदी आतपर्यंत अचूक हल्ला करण्याचे सामर्थ्यही वाढणार आहे. उपग्रहसदृश टेहळणी यंत्रणांमुळे देखरेख, पाळत ठेवणे, गोपनीय माहिती गोळा करणे या क्षमतांमध्ये भर पडणार आहे.

### नौदलासाठी अमेरिकेची टेहळणी विमाने

भारतीय नौदलासाठी, ४ मेगावॅट मरीन गॅस टर्बाईन आधारित इलेक्ट्रिक पॉवर जनरेटर आणि अतिरिक्त P-81 लांब पल्ल्याची सागरी टेहळणी विमान खरेदी करण्यासाठी मंजुरी देण्यात आली. P-8I विमानांच्या खरेदीमुळे नौदलाच्या लांब पल्ल्याच्या पाणबुडीविरोधी युद्ध, सागरी देखरेख आणि सागरी हल्ल्याच्या क्षमतांमध्ये निर्णायक वाढ होईल.

भारतीय तटरक्षक दलासाठी, डॉर्नियर विमानांसाठी इलेक्ट्रो-ऑप्टिकल/इन्फ्रारेड (EO/IR) प्रणाली खरेदी करण्यासाठी मान्यता देण्यात आली, ज्यामुळे त्यांच्या सागरी देखरेख मोहिमांना बळकटी मिळेल.

### भारतातच बनणार नवी राफेल

राफेल खरेदीचा हा करार 'मेक इन इंडिया 'अंतर्गत केला जाईल. डसॉल्ट एव्हिएशन एका भारतीय कंपनीसोबत मिळून ही विमाने तयार करणार आहे. अलीकडेच डसॉल्ट रिलायन्स एरोस्पेस लिमिटेड (DRL) मधील आपला हिस्सा डसॉल्टने ४९ टक्केवरून वाढवून ५१ टक्के केला आहे. या संयुक्त उपक्रमात अनिल अंबानींची रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर देखील भागीदार आहे.

या विमानांमध्ये भारतीय शस्त्रे, क्षेपणास्त्रे आणि दारुगोळा असेल. यासोबतच डसॉल्ट देणार असलेल्या सुरक्षित डेटा लिंकमुळे विमानांना भारतीय रडार आणि सेन्सर प्रणालीशी जोडता येईल. कंपनी एअरफ्रेम निर्मितीसाठी तंत्रज्ञान हस्तांतरण देखील देईल.

इंजिन निर्माता साफ्रान आणि एव्हियोनिक्स कंपनी थेल्सदेखील या प्रक्रियेचा भाग असतील, तंत्रज्ञान



हस्तांतरण पूर्ण झाल्यानंतर या विमानांमध्ये ५५ ते ६० टक्क्यांपर्यंत स्वदेशी घटक असण्याची अपेक्षा आहे.

### रणगाडाभेदी सुरुंग यंत्रणा

विभाव अँटी-टॅंक माइन्स खरेदी करण्यासाठी आणि आर्मर्ड रिकव्हरी व्हेईकल्स, टी-७२ टॅंक आणि BMP-II पायदळ लढाऊ वाहनांसाठी दुरुस्तीसाठीही गरजेनुसार आवश्यकतेला मंजुरी देण्यात आली.

### अमेरिकेकडून विमान खरेदी

बोईंगचे P-81 पोसीडॉन हे लांब पल्ल्याचे सागरी पाळत ठेवणारे आणि पाणबुडीविरोधी विमान आहे. भारतीय नौदलाकडे सध्या 12 P-8I विमाने आहेत, ज्यांनी ४० हजार तासांपेक्षा जास्त सुरक्षित उड्डाण पूर्ण केले आहे. ही विमाने हिंद महासागर क्षेत्रात पाळत ठेवण्यात आणि सामरिक हालचालींवर लक्ष ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

### सप्टेंबर २०२५ मध्ये हवाई दलाची मागणी

हवाई दलाने सप्टेंबर २०२५ मध्ये ११४ अतिरिक्त राफेल विमानांची मागणी संरक्षण मंत्रालयाकडे पाठवली होती. हवाई दलाकडे आधीपासूनच ३६ राफेल विमाने आहेत, तर नौदलाने २६ मरीन व्हेरिएंट राफेलची ऑर्डर दिली आहे. अंबाला हवाई तळावर राफेलचे प्रशिक्षण आणि देखभाल, दुरुस्ती केंद्र आधीपासूनच कार्यरत आहे. ■

# गहू, साखर निर्यातीला सरकारकडून मान्यता; गव्हाच्या अतिरिक्त उत्पादनांना परवानगी

**केंद्र** सरकारने २५ लाख मेट्रिक टन गहू आणि ५ लाख मेट्रिक टन गव्हाच्या इतर उत्पादनांच्या निर्यातीला मान्यता दिली आहे. यामुळे देशांतर्गत बाजारपेठेला स्थैर्य मिळेल आणि उत्पादकांना लाभदायक परतावा मिळेल. यासाठी हे निर्णायक आणि शेतकरी–केंद्रित पाऊल उचलले आहे. सध्याची उपलब्धता आणि किंमतीच्या परिस्थितीचे व्यापक मूल्यांकन केल्यानंतर विचारपूर्वक हा निर्णय हा घेण्यात आला आहे.हा निर्णय शेतकऱ्यांचे हितरक्षण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेला पुनश्च समर्थन देतो.

२०२५–२६ दरम्यान खाजगी संस्थांकडे सुमारे ७५ लाख मेट्रिक टन गव्हाचा साठा आहे. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत हा साठा जवळजवळ ३२ लाख मेट्रिक टन जास्त आहे. वर्षानुवर्षे होणारी ही लक्षणीय वाढ देशातील पुरवठ्याची स्थिती व्यवस्थित असल्याचे दर्शवते. यासोबतच, साखरेची निर्यात सुलभ करण्यासाठी, भारत सरकारने चालू साखर हंगाम २०२५–२६ दरम्यान इच्छुक साखर कारखान्यांना अतिरिक्त ५ लाख मेट्रिक टन साखर निर्यात करण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी, सरकारने १४ नोव्हेंबर २०२५. रोजी दिलेल्या आदेशानुसार, २०२५–२६ या चालू वर्षातील साखर हंगामादरम्यान १५ लाख मेट्रिक टन साखर निर्यात करण्याची परवानगी दिलेली आहे.

साखर कारखान्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ३१ जानेवारी २०२६पर्यंत फक्त १.९७ एलएमटी साखर निर्यात करण्यात आली आहे. याशिवाय, साखर कारखान्यांनी आजपर्यंत अंदाजे २.७२ एलएमटी साखर निर्यातीसाठी करार केला आहे. जर इच्छुक साखर कारखान्यांनी वाटप केलेल्या प्रमाणापैकी किमान ७०% साखरेची निर्यात ३० जून २०२६ पर्यंत केली तर, त्यांना अतिरिक्त ५ एलएमटी साखर निर्यात करता येईल. इच्छुक साखर कारखान्यांना प्रमाणानुसार निर्यात कोटा वाटप केला जाईल आणि कारखान्यांना ऑर्डर जारी झाल्यापासून १५ दिवसांच्या आत ते त्यांच्या तयारीचे सादरीकरण करतील. अशा प्रकारे वाटप केलेला निर्यात कोटा इतर कोणत्याही साखर कारखान्यांसोबत बदलला जाणार नाही. ■

# अंगणवाड्यांसाठी 'पोषण ट्रॅकर' ॲप

**महिला** आणि बाल विकास मंत्रालयाने मिशन पोषण २.० अंतर्गत सर्व अंगणवाडी केंद्रे, अंगणवाडी सेविका आणि लाभार्थ्यांची निश्चित निर्देशकांवर आधारित देखरेख करणे आणि प्रगतीचा माग घेण्यासाठी पोषण ट्रॅकर प्रशासकीय सुविधा सुरू केली आहे. या ॲप्लिकेशनमुळे अंगणवाडी सेवांशी संबंधित माहितीचे जवळपास वास्तव वेळेत संकलन करणे सोपे झाले आहे. याअंतर्गत अंगणवाडी केंद्रे उघडणे, मुलांची दैनंदिन उपस्थिती, पूर्व प्राथमिक बालशिक्षण उपक्रम, मुलांच्या प्रगतीसंबंधीची देखरेख, शिजवलेले गरम अन्न आणि घरी नेण्यासाठीचा शिधा यांची तरतूद, तसेच प्रगतीचे मूल्यमापन या आणि अशा बाबींचा समावेश आहे.

सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० अंतर्गत, ५ वर्षांच्या कालावधीत (२०२१ ते २०२६) ५०,००० अंगणवाडी केंद्रांच्या इमारती बांधण्याची तरतूद आहे. आतापर्यंत एकूण १,००,३३३ अंगणवाडी केंद्रांचे सक्षम अंगणवाडी केंद्रांमध्ये अद्ययावतीकरण करण्यात आले आहे. पीएम जनमन (प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महा अभियान) या अभियानांतर्गत देशभरात एकूण २५०० अंगणवाडी केंद्रांच्या बांधकामाला मंजुरी देण्यात आली आहे. विशेषतः सामाजिकदृष्ट्या असुरक्षित वर्गवारीत येणारे आदिवासी गट (PVTGs) असलेल्या क्षेत्रांमध्ये १७८ अंगणवाडी केंद्रांच्या बांधकामासाठी मंजुरी देण्यात आली आहे. आदिवासी व्यवहार मंत्रालयाने धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान (DJGU). या अभियानाचा प्रारंभ केला. या अभियानांतर्गत सुमारे ६३ हजार ८४३ गावांमध्ये सेवांचे एकात्मिकीकरण करणे, लोकांपर्यंत पोहोचून प्रचार प्रसार करणे आणि योजनांचा लाभ पूर्णतः पोहचवला जाईल यावर भर देण्यात आला आहे. पूरक पोषण आहाराच्या वितरणातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायीत्वाची निश्चित करण्यासाठी पोषण ट्रॅकरच्या माध्यमातून गुणवत्ता हमी, कर्तव्यधारकांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या, खरेदी प्रक्रिया, आयुष संकल्पनांचे एकात्मिकीकरण तसेच माहितीसाठी व्यवस्थापन आणि देखरेखीशी संबंधीत सुनियोजितपणे आखलेली मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत. ■

# बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या ओव्हरहेड विद्युतीकरणाचे काम वेगात



**मुंबई-अहमदाबाद** बुलेट ट्रेन प्रकल्पाचे ओव्हरहेड इलेक्ट्रिफिकेशन मास्ट्स बसवण्याचे काम वेगाने सुरू आहे. ही प्रगती भारताच्या पहिल्या अतिजलद रेल्वे प्रणालीसाठी इलेक्ट्रिक ट्रॅक्शन सक्षम करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे आणि 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत जमिनीवरील सातत्यपूर्ण अंमलबजावणीचे ते प्रतीक आहे. यामुळे जागतिक स्तरावर सिद्ध झालेल्या हाय-स्पीड रेल्वे तंत्रज्ञानाचा अवलंब करताना देशांतर्गत उत्पादन क्षमतांना बळकटी मिळत आहे.

सुरक्षित, सुरळीत आणि कार्यक्षम अतिजलद ट्रेनच्या परिचालनाला आधार देण्यासाठी, व्हायाडक्टच्या भागांसह मार्गाच्या महत्त्वाच्या विभागांमध्ये ओएचई खांब बसवण्याचे काम सुरू आहे. हे मास्ट्स या कॉरिडॉरवर धावणाऱ्या बुलेट ट्रेनना वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेल्या ट्रॅक्शन पायाभूत सुविधेचा महत्त्वाचा भाग आहेत. ओएचई खांब जमिनीच्या पातळीपासून लक्षणीय उंचीवर असलेल्या उन्नत व्हायाडक्ट्सवर बसवले जात आहेत. एकूणच या मार्गावर ९.५ ते १४.५ मीटर उंचीचे २०,००० पेक्षा जास्त खांब बसवले जातील. हे खांब बुलेट ट्रेनच्या परिचालनासाठी आवश्यक असलेल्या ओव्हरहेड तारा, अर्थिंग व्यवस्था, फिटिंग्ज आणि इतर उपकरणांसह संपूर्ण २÷२५ केव्ही ओव्हरहेड ट्रॅक्शन पॉवर सिस्टीमला आधार देतील.

अखंड कर्षण वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी, मुंबई-अहमदाबाद अतिजलद रेल मार्गावर ट्रॅक्शन सबस्टेशन्स (टीएसएस) आणि डिस्ट्रिब्युशन सबस्टेशन्स (डीएसएस) चे जाळे विकसित केले जात आहे.

ओएचई खांब म्हणजे रेल्वे रुळांच्या बाजूला उभारलेल्या उभ्या पोलादी संरचना असतात, जे ओव्हरहेड विद्युत तारांना आधार देतात. ते तारांची योग्य उंची, संरेखन आणि ताण कायम राखतात, ज्यामुळे इलेक्ट्रिक गाड्यांना सतत आणि सुरक्षित वीजपुरवठा करणे शक्य होते.

एकदा पूर्ण झाल्यावर, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन दोन्ही शहरांदरम्यानचा प्रवास अधिक वेगवान आणि सोयीस्कर करेल, तसेच संपूर्ण मार्गावरील संचारसंपर्कात सुधारणा सुधारेल.

या प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती आणि उत्पादन क्षेत्राला बळकटी मिळाल्याने प्रवासी, स्थानिक अर्थव्यवस्था आणि भारतीय उद्योगाला फायदा होण्याची अपेक्षा आहे. देशात प्रगत रेल्वे तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या आणि जागतिक दर्जाची रेल्वे पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. ■

# सिने कलाकारांसाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्यात येणार

## कामगार मंत्री आकाश फुंडकर यांची माहिती



**सिने** कलाकारांसाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्यात येणार असून, नियमावलीचा मसूदा तयार झाल्यानंतर कला क्षेत्रातील अभ्यासू व संबंधित घटकांकडून सूचना मागविण्यात येतील. प्राप्त सूचनांचा सकारात्मक विचार करून अंतिम नियमावली तयार केली जाईल. कामगार मंत्री फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली नवीन कामगार संहिता (Labour Code) च्या अनुषंगाने सिने कलाकारांसाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याबाबत मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस कामगार विभागाचे अपर मुख्य सचिव आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त एच. पी. तुम्मोड, उपसचिव रोशनी पाटील, प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे, पुनम ढिल्लो यांच्यासह मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सिने क्षेत्रातील कलाकार, तंत्रज्ञ व कामगारांच्या सामाजिक सुरक्षा, वेतन, विमा, कामाचे तास, कल्याणकारी योजना तसेच कामगार संहितेतील तरतुदींची अंमलबजावणी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सिने कलाकारांच्या हितासाठी स्वतंत्र नियमावली तयार करून त्यांना कायदेशीर संरक्षण देण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. नवीन कामगार संहितेच्या चौकटीत सिने क्षेत्रातील कलाकार व संबंधित कामगारांच्या हितासाठी स्पष्ट व प्रभावी नियमावली तयार करण्यात येईल. त्यांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. यावेळी (सिंटा) सिने एंड टेलीविज़न आर्टिस्ट एसोसिएशन वतीने अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे आणि पुनम ढिल्लो यांनी चित्रपटसृष्टीतील कलाकार, तंत्रज्ञ, सहाय्यक व विविध विभागांतील कामगारांना भेडसावणाऱ्या समस्या मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिल्या. बैठकीदरम्यान नियमावली संदर्भात सविस्तर सादरीकरण करण्यात आले. ■

# 'एन. ए.' परवानगीची अट रद्द

**राज्यात** कृषी क्षेत्र अकृषक करताना एन. ए. परवानगीची अट रद्द करण्यात आली आहे. एन. ए. करताना आता नगर रचना विभाग आणि स्थानिक प्राधिकरणाने दिलेली बांधकाम नकाशा परवानगी हीच आता एन. ए. परवानगी असणार आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून स्वतंत्र बांधकाम परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून राजपत्र जारी करण्यात आले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत महत्वपूर्ण सुधारणा करण्यात आली. आता वार्षिक अकृषक कर देखील रद्द करण्यात आला आहे.

**सर्वसामान्य जनतेला यामुळे दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मी हा निर्णय घेतला. यासाठी आवश्यक त्या सर्व सुधारणा महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत करण्यात आल्या. हिवाळी अधिवेशातच याबाबतची रूपरेषा ठरली होती. फडणवीस सरकार जनतेच्या कल्याणासाठी काम करते, याचे प्रत्यंतर देणारा हा निर्णय आहे. आता वार्षिक अकृषक कर देखील रद्द करण्यात आला आहे.**

**– चंद्रशेखर बावनकुळे महसूलमंत्री**

### जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज संपली

आतापर्यंत नागरिकांना नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम नकाशाला मंजूरी घेतल्यानंतर पुन्हा जिल्हाधिकाऱ्यांकडे अकृषक परवानगीसाठी चकरा माराव्या लागत होत्या. नव्या नियमानुसार, जर एखाद्या जमिनीचा वापर विकास आराखड्यानुसार अनुज्ञेय असेल, तर नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगी हीच 'अकृषक परवानगी' मानली जाईल. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची किंवा सनदेची गरज राहणार नाही.

### बँक कर्जासाठी सनदेची अट रद्द

अनेक बँका कर्ज देताना अकृषक सनदेचा आग्रह धरतात. मात्र, शासनाने स्पष्ट केले आहे की, नियोजन प्राधिकरणाची परवानगी मिळाल्यावर बँकांनी सनदेसाठी आग्रह धरू नये. जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश सर्व बँकांच्या निदर्शनास आणून द्यावेत, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

### जुन्या थकबाकीतून मुक्तता

ज्या नागरिकांचा अकृषक कर थकीत आहे, त्यांना दिलासा देताना शासनाने या सुधारणेच्या दिनांकापर्यंतचा थकीत कर वसूल करण्यापासून सूट दिली आहे. मात्र, ज्या जमिनी २००१ पूर्वी किंवा त्यानंतर बिनशेती झाल्या आहेत, त्यांच्या मालकांना या शासन निर्णयापासून एक वर्षाच्या आत विहित दराने एकरकमी अधिमूल्य भरावे लागेल. या नव्या नियमांबरोबरच बांधकाम परवानगीसाठी इझचड किंवा uto DCR द्वारे ऑनलाईन अर्ज करता येईल.

बांधकाम परवानगी मिळताच महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीद्वारे ७/१२ उताऱ्यात आपोआप फेरफार नोंद घेतली जाणार आहे. केवळ बांधकाम परवानगी मिळाली म्हणून 'भोगवटादार वर्ग-२' (कमी श्रमाच्या जमिनी) च्या दर्जामध्ये बदल होणार नाही; त्यांच्यासाठी आवश्यक असलेले नजराणा शुल्क भरावेच लागेल.

### एकवेळचा रुपांतरण दर

दरवर्षी भरावा लागणारा अकृषक कर रद्द करून त्याऐवजी जमिनीच्या बाजारमूल्यानुसार टप्पा निहाय एकरकमी 'रुपांतरण अधिमूल्य' (Conversion Premium) आकारले जाईल. त्याचे दर खालीलप्रमाणे असतील.

### भूखंडाचे क्षेत्रफळ एकरकमी अधिमूल्य दर

- १००० चौ.मी. पर्यंत – चालू बाजार मूल्याच्या ०.१०%
- १००१ ते ४००० चौ.मी.– चालू बाजार मूल्याच्या ०.२५%
- ४००० चौ.मी. पेक्षा जास्त– चालू बाजार मूल्याच्या ०.५०%

# कोल्हापुरातील जनसंघापासूनच्या कार्यकर्त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण




**कोल्हापुरात जनसंघ–भाजपाचे काम करणे ही अत्यंत अवघड गोष्ट होती. कोल्हापूरच्या महापौरपदी भाजपाच्या रुपाराणी निकम यांची निवड झाल्यानंतर जनसंघापासून काम केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे एका फलकाद्वारे कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यात आले.** ***कोल्हापूरचे सुपुत्र व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या संकल्पनेतून हा फलक तयार झाला.***

# परभणी जिल्ह्यातील भाजपाचे अभूतपूर्व यश

**परभणी** जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर मेघना बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाची संघटनात्मक व राजकीय ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. पूर्वी परभणी जिल्ह्यात भाजपचा एकही नगराध्यक्ष नव्हता, आता दोन नगराध्यक्ष कार्यरत आहेत. नगरसेवकांची संख्या ४ वरून ४२ पर्यंत वाढली आहे. महापालिका सदस्यांची संख्या ८ वरून १२ झाली आहे. जिल्हा परिषद सदस्य ५ वरून २४ पर्यंत पोहोचले आहेत. पंचायत समिती सदस्यांची संख्या आता ४४ झाली आहे. ही वाढ केवळ आकड्यांची नाही, तर भाजपच्या



धोरणांवर जनतेने दाखविलेल्या विश्वासाची साक्ष आहे. जिल्ह्यात विकासकामांना गती देत, संघटन मजबूत करत आणि कार्यकर्त्यांना बळ देण्याचे कार्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी प्रभावीपणे केले आहे.

**जनसंघ आणि भाजपाच्या स्वर्गीय गणपतराव गव्हाणे, स्व. उषाताई साने, स्व. डॉ मधुकरराव चौधरी, स्व. कृष्णकुमार मोहरी, स्व. माधवराव सायळकर, स्व. हरिहरराव चौधरी, स्व. दौलतराम रिजवानी, विजय जोशी, सुधाकर चिद्रावार, ॲड श्रीरामपंत बुद्रुक या कार्यकर्त्यांच्या श्रमाच्या पायावर पक्षाचे हे यश उभे आहे.** ■

# महाराष्ट्रातील भाजपाच्या 50 जैन नगरसेवकांचा सन्मान समारोह



**प. पू. आचार्य** श्री नयपद्मसागर महाराज जी तसेच साध्वी श्री मयनाश्री जी यांच्या पावन सानिध्यात जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन, अखिल भारतीय जैन अल्पसंख्यक महासंघ आणि भाजपा जैन प्रकोष्ठ, महाराष्ट्र प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय जनता पक्षातून नवनिर्वाचित ३३ जैन नगरसेवकांचा भव्य सत्कार समारंभ मुंबई येथे अत्यंत उत्साहपूर्ण तावरणात संपन्न झाला.

या समारंभास मुख्य अतिथी म्हणून कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, ज्येष्ठ नेते आ. चैनसुख संचेती, जैन अल्पसंख्यक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ललित गांधी, आ. नरेंद्र मेहता, मीरा-भायंदरच्या महापौर डिंपल मेहता, शायना एन.सी., मंजू लोढा, भाजपा मीरा-भायंदर जिल्हाध्यक्ष दिलीप जैन हे प्रमुख उपस्थित होते.

सर्व मान्यवरांनी नवनिर्वाचित जैन नगरसेवक व भाजपा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत संबोधित केले. आपल्या आशीर्वचनांत आचार्य नयपद्मसागर महाराज यांनी सांगितले की, धर्ममूल्यांची जोपासना करत राजकारणात जैन युवकांचा सक्रिय सहभाग ही आजच्या काळाची गरज असून, त्यातून समाज राष्ट्रनिर्माणात अधिक प्रभावी भूमिका बजावू शकतो. साध्वी श्री मयनाश्री जी यांनी राजकारणातील नारीशक्तीच्या वाढत्या सहभागाबाबत समाधान व्यक्त करत, जैन समाजातील अधिकाधिक महिलांची नगरसेवक म्हणून निवड होणे ही समाजासाठी अभिमानाची बाब असल्याचे नमूद केले.


मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी नवनिर्वाचित जैन नगरसेवकाना जनसेवेचे स्पष्ट निकष समजावून सांगत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार, विकासनीती व राष्ट्रहिताचा संकल्प जन-जनापर्यंत पोहोचवणे हे प्रत्येक लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन वीरेंद्र शाह, घेवरचंद बोहरा, नितिन वोरा, जश वीरा यांनी केले. सूत्रसंचालन संदीप भंडारी यांनी केले. आभार प्रदर्शन जैन प्रकोष्ठचे सरचिटणीस विकास अच्छा यांनी केले. ■

# कोल्हापूर येथील ज्येष्ठ कार्यकर्ते भाऊराव गणपुले यांचे निधन

**भाऊराव** गणपुले यांचे कोल्हापूर येथे नुकतेच निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. गणपुले अविवाहित होते. गेली बहात्तर ते वर्षं संघाचं आणि १९८० पासून भाजपचं काम करत होते. पांढरी आखूड विजार, कधीही इस्त्रीचा स्पर्श न झालेला पांढरा सदरा, मानेभोवती लपेटलेलं आणि दोन्ही खांद्यावरून रूळणारं 'जय श्रीराम'चं भगवं उपरणं, काळी टोपी, कपाळावर गंध आणि पायात जुनीपुराणी चप्पल! काळ बदलला.. पण गणपुले मात्र जिथे होते तिथेच राहिले... अत्यंत गरिबीत आणि तरीही समाधानीही राहिले. गणपुले हे मूळचे निपाणीचे त्यांचे वडील निपाणी येथे सुप्रसिद्ध डॉक्टर होते व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निपाणी तालुका संघचालक म्हणून त्यांच्यावर दायित्व होते. भाऊराव शिकवण्याकरता ५९-६० च्या दरम्यान कोल्हापुरात आले. कॉलेज शिक्षण घेत असताना सुद्धा त्यांनी सामाजिक कार्याला सुरुवात केली. जबलपूर येथे उषा भार्गव या कॉलेज विद्यार्थ्यांनीनी वर अत्याचार झाल्या होता व त्यामुळे तिने स्वतःला जाळून घेतले होते त्या विरोधात देशभर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने आंदोलन करण्याचे ठरवले होते त्याप्रमाणे कोल्हापुरात भाऊराव गणपुले यांनी पुढाकार घेऊन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने कोल्हापुरात कॉलेज विद्यार्थ्यांची मोठी सभा घेतली होती कोल्हापुरातील अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची सुरुवात भाऊराव गणपुले यांनी कोल्हापुरात केली.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते लहानपणापासूनचे स्वयंसेवक होते

सामाजिक व राजकीय आवड असल्यामुळे त्यांनी जनसंघ म्हणजे आत्ताचा भारतीय जनता पार्टी यामध्ये कामास सुरुवात केली. विशेषतः कोल्हापुरातील झोपडपट्टी, यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात त्यांनी जनसंघ म्हणून आंदोलन केले होते त्या सर्वांना त्या काळात रेशन कार्ड मिळवून देण्याकरता त्याने प्रयत्न केले फेरीवाल्यांच्या प्रश्नात सुद्धा त्याने आंदोलन उभे केले होते



महाद्वार व जोतिबा रोडवरील फेरीवाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यात त्यांचा मोठा पुढाकार होता व अद्याप आहे.

१९७५ च्या आणीबाणी विरोधात त्यांनी सत्याग्रह केला होता त्यात त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली होती शिक्षा होणे पूर्वी त्यांना मिसा या कायद्याखाली अटक झाली १६ महिने त्यांनी तुरुंगवास पत्करला.

### अयोध्या आंदोलनात सुद्धा त्यांचा सहभाग होता

सुरुवातीच्या काळात गणपुले यांनी विद्यार्थ्यांचे उत्तम प्रकारे क्लासेस चालवले होते त्यानंतर स्वतःचे व्यवसाय उभे केले होते. मिसामधील लोकांना न्याय मिळावा या मागणीसाठी त्यांनी पुढाकार घेतला होता व त्याप्रमाणे लोकांना त्यांनी न्याय मिळवून दिलेला आहे त्याचे कोल्हापूर जिल्ह्याचे प्रमुख म्हणून ते काम पाहत होते.

पंचानन हे साप्ताहिक त्यांनी जवळजवळ पंचवीस वर्ष चालवले. नुकताच २६ जानेवारी या दिवशी त्यांचा सत्कार कलेक्टर कचेरीमध्ये झालेला आहे. ते अविवाहित होते. त्यांच्या पश्चात त्यांचा भाऊ व त्यांचा चार्ट अकाउंटंट पुतण्या कोल्हापूरमध्ये आहे.

**भाऊराव यांना विनम्र आदरांजली**

**– प्रफुल्ल जोशी, कोल्हापूर**



शिरूर-कासार (जि.बीड)- मोफत आरोग्य शिबिर, तसेच ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार- भटके विमुक्त आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा ॲड. भाग्यश्री ढाकणे-चेमटे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




सिंधुदुर्ग- केंद्रीय अर्थसंकल्प प्रचार अभियान- उपस्थिती- कामगार मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस हनुमंत लांडगे, कामगार मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अशोक राणे, माजी नगराध्यक्ष प्रेमानंद साळगावकर, माजी नगरसेवक विलास जाधव, कोकण प्रभारी नारायण सावंत, जिल्हा परिषद सदस्य प्रमोद कामत आदी.




मुंबई- केंद्रीय अर्थसंकल्प प्रचार अभियान- उपस्थिती- कामगार मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष गजानन नागे, कामगार मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सिद्धार्थ पळसपगार, कामगार मोर्चा मुंबई प्रदेश उपाध्यक्ष झिनल पटेल, कामगार मोर्चा मुंबई प्रदेश सचिव डॉ. फरहाद अरोरा, कामगार मोर्चा मुंबई प्रदेश सचिव राजेश ओझा आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com